# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ / अग्रहायण २८, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(३)** | **बंदरे, खनिकर्म मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५२**

---

**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोगाने महावितरणला ग्राहकांडून सुधारित वीज दराने आकारणी करण्याची दिलेली परवानगी**

**(१) * ५०६७० श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजु पारवे (उमरेड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातवीज नियामक आयोगाने सर्व कंपन्यांना राज्यासाठी वीज दर वाढविण्याची परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थिर आकार, वहन आकार, डीओडी, पॉवर फॅक्टर इन्सेंटिव्ह, हार्मोनिक्स पेनल्टी, अतिरिक्त इलेक्ट्रिसिटी ड्यूटी, वसुली सुरक्षा ठेव अशा अनेक बाबीद्वारे छुपी दरवाढ करून प्रत्येक वेळी एक टक्के, दोन टक्के ते पाच टक्के अशा स्वरुपात ही दरवाढ करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय, अशाप्रकारे होत असलेली वसुली रोखण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

विद्युत अधिनियम २००३ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि. ३० मार्च, २०२० रोजी आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीसाठी पारदर्शक पध्दतीचे अवलंब करुन बहुवर्षिय वीजदर आदेश (प्र.क्र.३२२/२०१९) पारित केले आहे. या बहुवार्षिय वीजदर आदेशात, मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने स्थिर आकार, वीज आकार व वहन

आकार निश्चित केले असून, त्याप्रमाणे महावितरणच्या विविध ग्राहक वर्गवारीकरीता वीज पुरवठा करण्यासाठी सुधारीत वीज दरांची आकारणी दि. ०१ एप्रिल, २०२० पासून लागू करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथे अवैध मार्गाने जमविलेल्या हजारो लिटर डिझेलसारख्या द्रव पदार्थाचा वापर "आपली बस" च्या वाहतुकीसाठी होत असल्याबाबत**

**(२) * ५१६१२ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथे अवैध मार्गाने जमविलेल्या हजारो लिटर डिझेलसारख्या द्रव पदार्थाचा वापर "आपली बस"च्या वाहतुकीसाठी होत असल्याचे दिनांक १५ जानेवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूरात चालणारी "आपली बस" सेवा हंसा सिटी बस सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडतर्फे संचलित केली जात असून स्टार बसचा डेपो एमआयडीसीतील राजेंद्र नगरात असल्याने गुन्हे शाखेने एमआयडीसीतील हंसा सिटी बस सर्व्हीसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या बस डेपोवर छापा टाकून टँकरसह २६.५५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी डेपो मॅनेजर आणि डेपो संचालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१),(२),(३) व (४) होय, हे खरे आहे.
प्रस्तुत प्रकरणी पोलीस आयुक्त, नागपूर शहर अंतर्गत पोलीस स्टेशन एमआयडीसी येथे गुरनं. ८६ / २०२२ कलम २८५, १८८ भा.दं.वि. सह कलम ३ व ७ जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५, सहकलम- ७,२३ पेट्रोलीयम ॲक्ट अधिनीयम १९३४ अन्वये दि.०२.०२.२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात रू.२६,५५,५५५/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयात डेपो मॅनेजर, संचालक असे एकूण ३ आरोपी निष्पन्न झाले असुन आरोपीविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिवनई (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील पाझर तलावालाच्या संचित जलसाठ्यातुन पाण्याची गळती होत असल्याबाबत**

**(३) * ५०२३४ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवनई (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील पाझर तलावाला लागलेल्या गळतीच्या दुरुस्तीचे काम सन २०२२ मध्ये केलेले असतांना पाझर तलावाच्या संचित जलसाठयातून पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात गळती होत असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पाझर तलावाच्या दुरुस्तीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर पाझर तलावातील गळती थांबवून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) पाझर तलावाची एकुण लांबी ५४० मीटर इतकी आहे. त्यापैकी साखळी क्रमांक २४० ते ३६० (१२० मी लांबी) या भागातील पाझर तलावाच्या पायामधून मोठया प्रमाणात पाण्याची गळती होत होती. त्यामुळे पाझर तलावाच्या या बाजुस जलरोधक खंदक (+ve COT) करून पाणी गळती थांबविणे ,कवच भराव व अश्मपटल यांची दुरूस्ती तसेच सांडवा बांधकाम इत्यादी बाबींचा दुरूस्ती अंदाजपत्रकात समावेश करण्यात आला होता. त्यानुसार जलरोधक खंदक (+ve COT)चे काम तसेच कवच भराव व अश्मपटल यांची दुरूस्ती व सांडव्याचे बांधकाम या सर्व बाबी १५ /१०/२०२१ ते १२/०२ /२०२२ या कालावधीमध्ये कामाचा दर्जा राखून व गुणवत्तापूर्वक पूर्ण करण्यात आल्या आहेत.
सदयस्थितीत प्रस्तुत कामाची दिनांक ०७/१२/२०२२ रोजी पाहणी केली असता संचित जलसाठयातून कोणत्याही प्रकाराची जलाशयाची गळती होत नसल्याचे आढळून आले आहे.सदर पाझर तलावात आजमितीस ८०% पाणीसाठा उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) प्रश्न उद्धवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाला हस्तांतरित केलेल्या गिरणी कामगारांच्या घरांच्या सोडतीबाबत

**(४) * ४९४५७ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (MMRDA) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाला हस्तांतरित केलेल्या सुमारे २,५२१ गिरणी कामगारांच्या घरांच्या सोडतीचा प्रश्न अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याने या संदर्भात गिरणी कामगार कृती समितीच्या शिष्टमंडळाची मा. उप मुख्यमंत्री यांच्यासमवेत दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास बैठक झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न मार्गी लावण्याबाबत ‘समर्थन’ संस्थेने मा. उप मुख्यमंत्री , अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्याकडे दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे, रायगड येथील एकूण २,५२१ घरे देऊन मुंबई गृहनिर्माण मंडळातर्फे गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न महिन्याभरात मार्गी लावण्याचा निर्णय शासनाने घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गिरणी कामगारांचा घरांचा प्रश्न कालबध्द पध्दतीने मार्गी लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशी बैठक झाल्याचे आढळून येत नाही.

(२) होय हे खरे आहे.

(३) रेंटल हाऊसिंग योजने अंतर्गत एम.एम.आर.डी.ए. कडून म्हाडाकडे प्राप्त झालेल्या २,५२१ सदनिकांची सोडत काढण्याची कार्यवाही म्हाडामार्फत करण्यात येत आहे.

(४) व (५) बृहन्मुंबईमध्ये गिरण्यांच्या जागेवर म्हाडास उपलब्ध होणारी जागा व गिरणी कामगारांच्या अर्जांची संख्या विचारात घेता, ठाणे जिल्ह्यातील ५ गावातील ११० एकर शासकीय जमिनी गिरणी कामगारांच्या घरांकरीता म्हाडास उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणातील भरती परीक्षेत होणारे गैरप्रकार रोखण्याबाबत**

**(५) * ५२४९४ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणामधील विविध संवर्गातील ५६५ रिक्त पदांसाठी घेण्यात आलेल्या ऑनलाइन परीक्षेत गैरप्रकार झालेला असताना पुन्हा म्हाडा प्राधिकरणाने टीसीएस संस्थेच्या माध्यमातून परिक्षा घेतल्या व त्याही परिक्षेत गैरप्रकार झाल्याची बाब दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली , हे खरे आहे काय;

(२) असल्यास, टीसीएस संस्थेने या गैरप्रकारासंदर्भात केलेल्या चौकशीचा अंतिम अहवाल म्हाडा प्राधिकरणाला सादर केला असून त्यामध्ये निवड यादीतील ६३ पैकी ६० उमेदवार दोषी आढळले असल्याची माहिती समोर आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोषींना अटक करून त्यांच्यावर कोणत्या कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

(४) असल्यास, म्हाडा प्राधिकरण यांच्या भरती परिक्षेत होणारे गैरप्रकार रोखण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे व करण्यात येत आहे;

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

शासनाने नियुक्त केलेल्या ५ ओ. एम. आर. व्हेंडर कंपन्यांपैकी में. जी.ए. सॉफ्टवेअर टेक्नोलॉजी प्रा. लि. या कंपनीमार्फत ऑफलाईन पध्दतीने परीक्षा पुण्यात घेण्यात येणार होती. तथापि, मे. जी.ए. सॉफ्टवेअर टेक्नोलॉजी प्रा. लि. या कंपनीचे संचालक डॉ. प्रितीश देशमुख यांना अन्य दोन व्यक्तीसह पुणे सायबर पोलीस यांनी म्हाडा पदभरती परीक्षा होण्यापूर्वीच दि.११.१२.२०२१ रोजी गोपनियतेचा भंग प्रकरणी अटक केली होती. त्यांच्या विरुद्ध प्राधिकरणातर्फे दि.१२.१२.२०२१ रोजी सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे प्रथम खबरी अहवाल क्र.५५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

म्हाडा सरळसेवा भरती करीता ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेण्याकरीता टी.सी.एस. लि. यांची नियुक्ती करण्यात आली. टी.सी.एस. लि. यांचेमार्फत ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आलेल्या परीक्षेमधील गुणवत्तेच्या आधारे कागदपत्रे सादर करण्याकरीता बोलविण्यात आलेल्या एकूण १६३३ उमेदवारांचे फोटो व लॉग डीटेल्स तपासण्यात आले. त्यापैकी ६१ उमेदवारांचे फोटो जुळत नसल्याने किंवा लॉग डिटेल्स शंकास्पद असल्याने त्या उमेदवारांना संशयास्पद वर्गवारीमध्ये ठेवण्यात आले. चौकशी पुर्ण होईपर्यंत त्यांचे निकाल राखून ठेवण्यात आले असून ६० संशयित उमेदवारांविरुद्ध खेरवाडी पोलीस स्टेशन, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे दि.०७.१२.२०२२ रोजी प्रथम खबरी अहवाल क्र. १०१५/२०२२ दाखल केला आहे.

(३) व (४)

६० संशयित उमेदवारांविरुध्द भारतीय दंडसंहिता १८६० कलम ४१९, ४२० व महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळांच्या व इतर विनिर्दीष्ट परिक्षांमध्ये होणा-या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९८२ कलम ७ व कलम ८ अन्वये प्रथम खबरी अहवाल क्र. १०१५ दि.०७.१२.२०२२ दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खडकपूर्णा प्रकल्पाच्या (जि.बुलढाणा) दरवाजांना फ्लॅप लावून उंची वाढवून अतिरिक्त पाणी साठा निर्माण करणेबाबत

**(६) * ५२८२९ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील खडकपूर्णा नदी प्रकल्प मोठा प्रकल्प असून प्रकल्पाच्या एकूण प्रस्तावित २०७२० इतक्या सिंचन क्षेत्रामधून १६७३ इतके सिंचन क्षेत्र लाभधारकांच्या विरोधामुळे नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये रद्द करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रद्द सिंचन क्षेत्राकरीता १.३१ दलघमी पाण्याची बचत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाच्या दरवाजांना ०.३० मी चे फ्लॅप बसविल्यास सुमारे ९.१४६ द.ल.घ.मी. अतिरिक्त पाणीसाठा निर्माण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री आणि मा. उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस : (**१)हे खरे आहे.

(२) हे खरे आहे. रद्द सिंचन क्षेत्राकरीता ९.३१ दलघमी पाण्याची बचत हॊणार आहे.

(३) होय,

(४) खडकपूर्णा प्रकल्पाच्या दरवाजांना फ्लॅप लावून उंची वाढविणे,अतिरिक्त पाणी साठा निर्माण करण्याच्या अनुषंगाने जलविज्ञान विभागामार्फत पाणी उपलब्धतेचा अभ्यास सादर करणे आवश्यक आहे . तसेच यासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र, आवश्यक आहे. सदर पाणी उपलब्धता प्रस्ताव सादर करतांना त्यांचे तपासणी सुचीतील अ.क्र.८(ब) नुसार प्रकल्प ज्या खो-यात आहे त्या खो-यातील जलसंपत्ती मालकी हक्क असलेल्या महामंडळ/मुख्य अभियंता यांची पाणी उपलब्धतेबाबत व प्रस्तावित बांधकामाविषयी सहमती आवश्यक आहे. त्याअनुषंगाने याबाबतचा सविस्तर अहवालास सहमती घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील डोबिंवली (प) येथील सिध्दार्थनगर झोपडपट्टीतील संरक्षक भिंत कोसळून मंजुरांचा झालेला मृत्यु

**(७) * ५४१६८ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपर रोड (जि.ठाणे) डोंबिवली पश्चिमेकडील सिद्धार्थनगर झोपडपट्टी परिसरातील रेल्वेच्या जागेतील १२ फुट उंचीची जुनी संरक्षक भिंत अंगावर कोसळून २ मजुरांचा मृत्यू तर तिघे जण जखमी झाल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी विष्णुनगर पोलिसांनी अटी शर्तीचे उल्लंघन केल्याबाबत शिवा एंटरप्रायझेस या बांधकाम कंपनीवर गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दाखल केलेल्या गुन्ह्यानुसार शिवा एंटरप्रायझेस कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, मृत्यू झालेल्या मजुरांच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय. दिनांक २१/०९/२०२२ रोजी सदरची घटना घडली असून याकरिता जबाबदार शिवा एंटरप्रायझेस यांच्याविरुद्ध विष्णूनगर पोलीस ठाणे, ठाणे शहर गु.र.नं. ३००/२०२२, भादंवि कलम ३०४ प्रमाणे दि.२१/०९/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(३) नमूद गुन्हयातील शिवा एंटरप्रायझेस, कांजूरमार्ग, मुंबई या कंपनीचे मालक यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अटकपूर्व जामीन मंजूर होणेकामी क्रिमीनल अटकपूर्व जामीन अर्ज क्र.३१५२/२०२२ दाखल केला होता. मा.न्यायालयाने त्यास अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.
(४) सदर गुन्हयातील भिंत पडल्याचा प्रकार हा रेल्वे प्रशासनाचे अखत्यारीतील आहे. संबंधित ठेकेदार कंपनीने सदर घटनेतील ३ जखमी व्यक्तींचा हॉस्पिटलचा संपूर्ण खर्च करुन प्रत्येकी १० हजार रुपये देण्यात आले आहे. तसेच यातील मयत २ व्यक्तींच्या नातेवाईकांना प्रत्येकी १ लाख रुपये रोख व ३ लाख रुपयांचे चेक दिलेले आहेत.

तसेच या कामगारांच्या विम्याबाबत लेबर कोर्ट, ठाणे यांच्याकडे प्रकरण प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील रेमंड कंपनीवर वीजचोरी प्रकरणी दंड आकारण्यात आल्याबाबत

**(८) * ५०९५८ श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महापालिका हद्दीतील रेमंड कंपनीवर वीजचोरी प्रकरणी १ कोटी १ लाख ८८ हजार रुपयांचा दंड माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आकारण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपनी मालक व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा दंड माफ करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कंपनी मालक व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.
सदर ठिकाणी दि. २२.०६.२०२१ रोजी महावितरणव्दारे तपासणी केली असता, ग्राहकाने स्वत:च्या जागेत बांधकामाकरिता केबलव्दारे वीज पुरवठा घेतल्याचे निदर्शनास आल्याने विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १२६ अंतर्गत रु. १,०१,८८,८६५ इतक्या रक्कमेचे प्रोव्हीजनल असेसमेंटचे वीज देयक देण्यात आले होते.
(२) हे खरे नाही.
सदर प्रकरणी विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतूदीनुसार मुल्यांकन अधिकारी यांनी सुनावणी घेऊन उपरोक्त प्रोव्हीजनल असेसमेंटचे वीज देयक मागे घेण्यात आले.
(३) सहव्यवस्थापकीय संचालक, कोकण प्रादेशिक कार्यालय यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून सदर प्रकरणातील प्रक्रियेतील त्रुटींबाबत अधिक्षक अभियंता, ठाणे मंडळ यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अनुसूचित जमातींच्या प्रलंबित जात वैधता प्रमाणपत्रांबाबत

**(९) * ४९९६१ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.छगन भुजबळ (येवला), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जात पडताळणी समितीकडे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र तसेच वैधता प्रमाणपत्रासाठीचे

जवळजवळ १७ हजार १८७ दावे प्रलंबित असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रमाणपत्राअभावी आदिवासी युवकांचे शैक्षणिक व रोजगाराचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मनुष्यबळा अभावी न्यायालयाच्या आदेशानंतरही सदर प्रकरणे प्रलंबित असल्याची तक्रार आदिवासी संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशी प्रकरणे विनाविलंब व कालबध्दरित्या निकाली काढण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) अंशत: खरे आहे.
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडे ऑक्टोबर, २०२२ अखेर पडताळणीकामी एकूण १६०८८ इतकी प्रकरणे प्रलंबित आहेत.
(२), (३) व (४) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांनी त्यांच्याकडे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा नविन प्रकरणाचा परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर अशा प्रकरणांवर ६ महिन्यांच्या कालावधीमध्ये निर्णय घेण्याच्या सूचना दिनांक २७.०३.२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व समिती कार्यालयांना देण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने समित्यांना आवश्यक सर्व सुविधा पुरविण्याबाबत दिनांक २७.०३.२०१९ च्या पत्रान्वये आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना कळविण्यात आलेले आहे. व्यावसायिक व शैक्षणिक अभ्यासक्रमाची प्रकरणे निकाली काढण्यासाठी शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे वेळापत्रक जाहिर करण्यात आल्यानंतर विशेष मोहिम राबवुन प्रकरणे विहित कालमर्यादेत निकाली काढण्यात येतात. तसेच जास्त कालावधीची प्रकरणे निकाली काढण्याकरीता ऑक्टोबर, २०१९ पासून गती अभियान राबविण्यात येत आहे. तसेच समित्यांकडील प्रलंबित प्रकरणे, नियमित प्राप्त होणारी नवीन प्रकरणांची संख्या तसेच विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाने पारित केलेले आदेश विचारात घेऊन नविन ७ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## पिंपळगांव घोडे ( ता.आंबेगाव जि.पुणे ) येथील मुक्ताई शाळेचे विद्यार्थी घेऊन जाणा-या स्कूलबसचा झालेला अपघात

**(१०) * ४९५०६ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळगांव घोडे (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील मुक्ताई शाळेच्या विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी स्कूलबस गिरवली येथील आयुका केंद्राच्या घाट वळणावरुन दरीत पडून अपघात झाल्याचे दिनांक २७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाप्रकारचे अपघात टाळण्यासाठी स्कुलबसेसवर शासनाचे नियंत्रण आणण्याच्यादृष्टीने काही मार्गदर्शक तत्वे वा नियमावली करण्यात आली आहे वा करण्यात येणार आहे काय,
(३) सदर अपघाताची शासनाने सखोल चौकशी असल्यास त्याचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, अपघातात मृत व जखमींच्या कुटुंबियांना शासनाने तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मुलांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने, स्कुलबसवर शासनाचे नियंत्रण ठेवण्यासाठी गृह विभाग अधिसूचना दि.१२ मार्च,

२०११ अन्वये जिल्हास्तरावर पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्कुलबस सुरक्षितता समिती तसेच शालेय स्तरावर प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय दि.१८ मार्च, २०१६ अन्वये शाळेतील विद्यार्थ्यांना ने-आण करणाऱ्या वाहतूक बसबाबत सुरक्षित वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना सर्व शाळांना देण्यात आल्या आहेत.

(३) सदर प्रकरणी घोडेगाव पोलीस ठाणे येथे स्कुल बस चालक याच्या विरुध्द गु.र.नं.२२५/२०२२ भा.द.वि. कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ सह मोटार वाहन अधिनियम कलम १८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीस सी.आर.पी.सी. ४१ (अ)(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

(४) सदर अपघातात जखमीं विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीतून मदतीचा प्रस्तावावर जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गोवंडी शासकीय महिलागृहातून सहा अल्पवयीन मुलींनी पलायन केल्याबाबत

**(११) * ५३०७२ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोवंडी शासकीय महिलागृहातून सहा अल्पवयीन मुलींनी दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पलायन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी गोवंडी पोलीसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी दि. ११/०९/२०२२ रोजी गोवंडी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.४५६/२०२२ भा.द.वि. कलम ३६३ अन्वये नोंद करण्यात आला आहे.

(३) वरील गुन्हयामधील पळून गेलेल्या ६ अल्पवयीन मुली या स्वत:हून पळून गेल्याचे तसेच त्याकरिता कोणत्याही बाहेरील व्यक्तींने त्यांना मदत न केल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. सदर ६ मुली परत मिळाल्या असून या गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला असल्याने मा. न्यायालयात "क" वर्ग अहवाल सादर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव व बुलढाणा जिल्हयात तापी विकास खोरे महामंडळाच्या बोदवड परिसरात सिचंन योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१२) * ५३९२४ श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोदवड, मुक्ताईनगर व जामनेर (जि.जळगांव) तसेच मलकापूर आणि मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यासाठी प्रस्तावित असलेल्या तापी विकास खोरे विकास महामंडळाच्या बोदवड परिसर सिंचन योजनेच्या विविध कामांचे बोगस प्रस्ताव सादर करुन कंत्राटदारांनी तब्बल १५० कोटीपेक्षा आधिक निधीमध्ये गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने संबधित दोषी कंत्राटदार, अधिकारी-कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

याबाबत दि. १७.१०.२०२२ रोजी वा त्यासुमारास पत्र / निवेदन अथवा अशी कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धडगाव (जि.नंदुरबार) तालुक्यातील विवाहित तरुणीवर झालेला सामुहिक अत्याचार

**(१३) * ४९७६४ श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धडगाव (जि.नंदुरबार) तालुक्यातील विवाहित तरुणीवर सामुहिक अत्याचार करून तिचा दि. १ ऑगस्ट २०२२ रोजी वा त्यासुमारास खून केल्याची घटना दि. १३ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, विवाहीत तरुणीच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणी पोलिसांनी आत्महत्येचा गुन्हा दाखल केल्यामुळे पिडीत मुलीला न्याय मिळण्यासाठी मुलीच्या मृतदेहाचे मुंबईतील डॉक्टरांकडून पुन्हा शवविच्छेदन करण्याकरिता तिच्या पालकांनी ४४ दिवसांपासून मृतदेह मिठामध्ये ठेवल्याची हृदयद्रावक घटना दि. १३ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पिडीत कुटुंबाला न्याय मिळण्यासाठी तसेच संबंधित दोषी पोलीस अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन धडगाव पोलीस ठाणे, जि. नंदूरबार येथे गु.र नं. २०७/२०२२, भादवि कलम ३०६, ३४ अन्वये दिनांक ०२.०८.२०२२ रोजी आत्महत्येस प्रवृत्त केल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यात एकूण ०४ आरोपी असून ०१ विधीसंघर्षीत बालक आहे. तपासाअंती भादवि कलम ३०६, ३७६ (अ) (ड), ३५४, ३६३ आणि ३४ अन्वये मा. न्यायालयात दिनांक ३१.१०.२०२२ रोजी
(२) दि. ०२.०८.२०२२ रोजी गुन्हा दाखल झाल्यानंतर मयत हिचेवर धडगांव ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले होते. वैद्यकीय अधिकारी यांनी केलेल्या शवविच्छेदनाबाबत फिर्यादी यांचा आक्षेप होता. फिर्यादीने केलेल्या मागणी व अर्जानुसार दिनांक १२.०९.२०२२ रोजी मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धडगांव यांच्या परवानगीने पुन्हा

शवविच्छेदन करण्यात आले. यामध्ये मृत्युचे अंतिम कारण “ASPHYXIA DUE TO HANGING WITH EVIDENCE OF DECOMPOSITION (un-natural)” असे नमूद केले आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस ठाण्याचे तत्कालीन प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक व तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक यांना तात्काळ निलंबित करण्यात आले असून त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी करण्यात येत आहे. वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, धडगाव यांनी केलेल्या प्रथम शवविच्छेदनाची चौकशी करण्याकरिता जिल्हा शल्यचिकित्सक, नंदुरबार यांच्या स्तरावर त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीने दिनांक ३०.११.२०२२ रोजी अहवाल सादर केला असून पुढील कार्यवाही सुरु आहे. सदर गुन्ह्याचा तपास विशेष तपास पथक यांचेमार्फत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाघाडी बॅरेज लघु सिंचन प्रकल्पाचे (ता. दर्यापूर.जि.अमरावती) काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१४) * ५२५९७ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघाडी बॅरेज लघु सिंचन (ता. दर्यापूर.जि.अमरावती) प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून निर्माणाधीन झालेल्या कामात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट बांधकामामुळे सदर प्रकल्पाच्या भिंतीला तडे गेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक राहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्प बांधकाम करणाऱ्या कंपनी, कंत्राटदार तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) वाघाडी बॅरेज प्रकल्पाचे उर्ध्व बाजूकडील उजव्या बाजूची circular training wall(अंदाजे १८.०० मी. लांबी) सन २०२२ चे पावसाळयात झालेल्या अतिवृष्टीमुळे दिनांक १४/१०/२०२२ रोजी ढासळल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) हे खरे नाही. बॅरेजच्या मुख्य बांधकामाला कोणत्याही प्रकारचे तडे गेलेले नाहीत.

(४) याबाबत या बांधकामा संबंधित तत्कालीन अधिका-यांचे सदर भिंतीचे कामाबाबत खुलासे मागविण्यात आले आहेत. तसेच सदर कामाचा करारनामा चालु असून करारनामा अटी व शर्तीनुसार कंत्राटदारास सदर काम पुनर्स्थापित करणेबाबत कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात आदिवासी भागातील विकासासाठी असलेल्या ठक्करबाप्पा**
**योजनेला निधी मिळाला नसल्याबाबत**

**(१५) * ४९६२६ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागातील विकासासाठी असलेल्या ठक्करबाप्पा आदिवासी सुधार योजनेला गेल्या २ वर्षापासून निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधीअभावी राज्यातील ३० आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत विकास कामे ठप्प झाली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, निधी उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत व आदिवासी भागाचा विकास होऊन त्यांना मुलभुत सुविधा मिळण्यासाठी तात्काळ निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.
सन २०२१-२२ करिता जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेसंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या दिनांक २०/१/२०२१ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये "पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ टक्के अबंध निधी" ही राज्यस्तरावरील योजना जिल्हा योजनेअंतर्गत वर्ग करण्यात आली असल्यामुळे जिल्हा स्तरावरील समप्रमाणातील दायित्व कमी करण्यासाठी "ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा" ही योजना सन २०२१-२२ पासून राज्यस्तरावर वर्ग करण्यात आली आहे. सदर अनुषंगाने या योजनेंतर्गत घ्यावयाची कामे, अंमलबजावणी यंत्रणा/कार्यपद्धती व इतर निकष सुधारित करण्याचा प्रस्ताव मा. मंत्रिमंडळ बैठकित सादर करण्यात आला असता सदर प्रस्तावावर मंत्रिमंडळाने चर्चा करुन "मंत्री मंडळास शिफारस करण्यासाठी मंत्री मंडळ उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे." त्यानुसार मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली असून समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मा. मंत्रिमंडळास सादर करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सूरजागड (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) लोहप्रकल्पातील वाढीव उत्खननाबाबत

**(१६) * ५०५४३ श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सूरजागड (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) लोहप्रकल्पात वाढीव उत्खननामुळे १३ आदिवासी बहूल गावांचे विस्थापन करावे लागणार आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास , या संदर्भात दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी प्रशासनामार्फत जनसुनावणी आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उत्खननामुळे या परिसरात कायम प्रदुषण, धुळ, वाहतूक कोंडी, खराब झालेले रस्ते अशा अनेक अडचणीमुळे स्थानिक रहिवाशी त्रस्त झाले असून त्यांच्यावर गाव सोडण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास , उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) मौजा, सुरजागड, ता.एटापल्ली, जि.गडचिरोली येथील मे.लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लि. यांचे नावे असलेल्या लोह खनिजाच्या खाणपट्टयाचे एकूण मंजूर क्षेत्र ३४८.०९ हे. इतके असून, सदरचे संपूर्ण क्षेत्र हे वन जमीनीवर स्थित असून, या संपूर्ण क्षेत्रावर अथवा आजूबाजूच्या परिसरात एकही गाव अथवा रहिवासी क्षेत्र अथवा राहते घर अस्तित्वात नाही. त्यामुळे विस्थापनाचा प्रश्न निर्माण झालेला नाही.
(२) केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या दिनांक २९/०५/२००६ रोजीच्या ना-हरकतीनुसार विषयाधीन खाणक्षेत्रातून लोह खनिजाच्या उत्पादनाची मर्यादा ही ३.०० दशलक्ष टन इतकी असून, सदरची मर्यादा १० दशलक्ष टन इतकी वाढवून मिळण्यासंदर्भात, खाणपट्टाधारकाकडून, पर्यावरण विभागाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

उत्खननाची मर्यादा वाढविण्यापूर्वी अशा प्रकरणात नियमानुसार जनसुनावणी घेऊन, निर्णय घेणे आवश्यक असल्याने व त्याअनुषंगाने पर्यावरण विभागाने केलेल्या विनंतीनुसार, जिल्हाधिकारी स्तरावरावर दिनांक २७/१०/२०२२ रोजी जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली होती, हे खरे आहे.
(३) खदानीमधून निघणाऱ्या लोह खनिजाची वाहतूक ही, प्रत्यक्ष खाण क्षेत्र-हेडरी- एटापल्ली- आलापल्ली या अंदाजे ४२ कि.मी.च्या मार्गावरुन होत असून, या रस्त्याचे, मे.लॉयडस मेटल्स ॲण्ड एनर्जी कंपनीकडून राष्ट्रीय महामार्गाच्या मानकानुसार मजबुतीकरण करण्यात आलेले असून, या संपूर्ण मार्गावर वाहतूक सुरुळीत ठेवण्याकरिता कंपनीकडून प्रत्येक २-३ कि.मी.वर कर्मचारी तैनात करण्यात आलेले आहेत.

खदानीमधून लोह खनिजाची वाहतूक करताना, प्रत्येक वाहनावर ताडपत्री झाकण्यात येत असून, रस्त्यावर धूळ

उडू नये, यासाठी कंपनीकडून नियमितपणे पाणी फवारण्याचे काम केले जाते.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मालाड (पूर्व), मुंबई येथील मेसर्स युनिटी इंटिरियर सोल्युशन कंपनी यांनी वस्तु व सेवा कर भरला नसल्याबाबत**

**(१७) * ४९५५१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरार व्हीलेज, मालाड (पूर्व) मुंबई येथील मेसर्स युनिटी इंटिरियर सोल्युशन कंपनीद्वारे शासनाचा सुमारे १ कोटी वस्तु व सेवा कर (विक्रीकर) बुडविल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी संबधित कंपनीकडून वस्तु व सेवा कर दंडासह वसुलीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय केली आहे.

(३) होय, मुल्यवर्धित कर कायदा २००२ नुसार वसुलीची पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे:

i) व्यापाऱ्याचे बँक खाते गोठवण्यात आले असून व्यापाऱ्याकडून ३६८६१४/- रुपयाची प्रत्यक्ष वसुली करण्यात आली आहे.

ii) भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४०९, ४०५, ३४ सह महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदा २००२ चे कलम ७४ अन्वये व्यापाऱ्यांविरुद्ध कुरार व्हिलेज पोलीस स्टेशन येथे दि.२७.०९.२०२२ रोजी विक्रीकर क्रमांकाचा गैरवापर तसेच विक्रीकराची रक्कम रुपये ६२,१०,६४०/- असे एकूण रक्कम रुपये १,०३,८३,८४५/- इतका विक्रीकर बुडवल्याबाबत (FIR No.०८९९अन्वये) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई शहर आणि उपनगरात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत विकासकांनी झोपडीधारकांचे घरभाडे प्रलंबित ठेवल्याबाबत**

**(१८) * ५२६४३ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत तब्बल १५० विकासकांनी झोपडपट्टीवासियांचे घरभाडे प्रलंबित ठेवले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकांकडूनही ७०० कोटी रुपयांपैकी केवळ १८ कोटी ४० लाख रुपये इतकीच रक्कम वसूल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिध्दार्थ नगर, गोरेगांव पश्चिम येथील पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पातील रहिवाशांना २५ हजार भाडे

देण्याचे निश्चित करण्यात येऊनही ते अद्यापही देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने घरभाडे भरणा न करणाऱ्या विकासकांवर कोणती कारवाई केली तसेच धारकांना वेळेत घरभाडे मिळण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत आजतागायत विकासकाकडून रु.१२२ कोटी ४० लाख इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.
(३) दि.०९.०७.२०२१ रोजी सिध्दार्थनगर सह.गृह.संस्थेच्या प्रलंबित पुनर्विकास प्रकल्पासंबंधी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये रहिवाश्यांचे भाडे देण्याकरिता म्हाडास प्राधिकृत करण्यात आले आहे. मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या सन, २०२२ च्या पावसाळी अधिवेशनात पत्राचाळ येथील मूळ भाडेकरुंना रु.२५,०००/- घरभाडे देण्यात येईल, अशी घोषणा केली आहे. त्यानुसार पत्राचाळ येथील मूळ ६७२ रहिवाश्यांना म्हाडाने रु.२५,०००/- दरमहा भाडे देण्याचे शासनाने दि.११.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

म्हाडाच्या मुंबई मंडळास सभासदांमार्फत प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे ९५ रहिवाश्यांना मार्च, २०२२ ते नोव्हेंबर, २०२२ पर्यंतचे ९ महिन्यांचे रु.२५,०००/- प्रतीमहा प्रमाणे भाडे देण्यात आले आहे.
(४) विकासकाच्या विक्री घटकातील इमारतीचे बांधकाम थांबविण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सहकार विभागाकडून अभियांत्रिकी विभागास शिफारस करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चावडी (जि.सोलापूर) येथील युवकांची आर्थिक फसवणूक झाल्याबाबत

**(१९) * ५०६२५ श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)सोलापूर शहरातील अनेक युवकांची सीसीएच ॲप व मॅक्स क्रिप्टो ॲपवर दाम दुप्पट डॉलर योजनेला बळी पडून आर्थिक फसवणूक झाल्याची तक्रार फौजदार चावडी पोलिस ठाणे येथे ५० ते १०० युवकांनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सोलापूर शहरातील फौजदार चावडी, पोलीस स्टेशन येथे सीसीएच ॲपचे मालक, एजंट यांच्या विरुध्द दिनांक १२.१०.२०२२ रोजी ३१ व्यक्तींनी आर्थिक फसवणूक झाल्याबाबत तक्रार केलेली आहे.
(२) सदर प्रकरणी चावडी पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गु.र.नं. ६०८/२०२२, भा.द.वि कलम ४२०,४०९,३४ सह, आय टी ॲक्ट कलम ६६ (डी), सह एम.पी.आय.डी.कायदा १९९९ चे कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(३) सदर प्रकरणात एकुण ७३ गुंतवणुकदार तसेच साक्षीदार यांचेकडे विचारपुस करण्यात येऊन यातील आरोपींची ६ बँक खाती गोठविण्यात आली आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासाकरीता सायबर पोलीस स्टेशन मधील अधिकारी व कर्मचारी यांची दोन स्वतंत्र तपास पथके नेमण्यात आली आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## उदगिर(जि. लातूर) तालुक्यातील ग्रामीण भागासाठी वीज पुरवठा करणाऱ्या १३२ के.व्ही.उपकेंद्रातील १६ एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफार्मर जळाल्याबाबत

**(२०) * ५०३५९ श्री.संजय बनसोडे (उदगीर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगिर (जि. लातूर) तालुक्यातील ग्रामीण भागासाठी वीज पुरवठा करणाऱ्या १३२ के.व्ही.उपकेंद्रातील १६ एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफार्मर जळाल्याने तेथील शेल्हाळ, तोंडविर, तादलापूर यासह २५ गावातील वीज पुरवठा बंद झाल्यामुळे ग्रामस्थांना अंधारात रहावे लागत असल्याचे दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या २५ गावांमध्ये विदयुत पुरवठा पुर्ववत होण्याकरिता नवीन ट्रान्सफार्मर बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच प्रस्तुत प्रकरणी दिरंगाई करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे. महापारेषण कंपनीच्या उदगिर येथील १३२/३३/११ के.व्ही. उपकेंद्रामधील १६ एमव्हीए क्षमतेचे पॉवर ट्रॉन्सफार्मर दि. ०४.०९.२०२२ रोजी नादुरुस्त झाल्याने सदर रोहित्रावरील सर्व फीडरचा विद्युतपुरवठा बंद झाला.

(२), (३) व (४) १३२ के.व्ही. उदगिर उपकेंद्रातील नादुरुस्त रोहित्र चाचणी आणि अंतर्गत तपासणी अंती जागेवर दुरुस्त होणे शक्य नसल्याने सदर रोहीत्र दि.०६.९.२०२२ रोजी पूर्णपणे नादुरुस्त झाल्याचे घोषित करण्यात आले. १३२ के.व्ही. जालना (एम.आय.डी.सी.) उपकेंद्र येथे उपलब्ध असलेले १३२/११ के.व्ही., २५ एम.व्ही.ए. चे रोहीत्र १३२ के.व्ही. उदगिर उपकेंद्रातील नादुरुस्त रोहीत्राच्या ठिकाणी चाचणी करुन दि.१४.९.२०२२ रोजी रात्री ०९.०० वा. कार्यन्वित करण्यात आले. दरम्यान दि.०५.०९.२०२२ रोजी महावितरण कंपनीने पर्यायी व्यवस्था करुन २५ गावांचा विद्युत पुरवठा सुरळीत केला होता.

-----------------

## अमरावती येथील महावितरणच्या स्काडा प्रणालीबाबत

**(२१) * ५१९५० डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)अमरावती येथील वीज ग्राहकांना अखंडित व सुरळीत वीजपुरवठा मिळण्यासाठी रु.४ ते ५ कोटी रूपये खर्च करुन केंद्र सरकार शासनाच्या योजनेतून महावितरणने ‘‘स्काडा’’ (सुपरव्हायझरी कंट्रोल ॲन्ड डाटा एक्वायझेशन सिस्टीम) प्रणाली सुरु केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देखभाली अभावी वर्षभरापासून ही प्रणाली पूर्ण क्षमतेने सुरु नसून १४ पैकी १० उपकेंद्र स्काडावर नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रणालीच्या देखभाल-दुरुस्तीचे कंत्राटही माहे जून,२०२१ पासून संपले असून यासंदर्भात पुढील कोणतीही कार्यवाही शासनाकडून झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) होय हे अंशत: खरे आहे.

अमरावती स्काडा वितरण प्रणाली अंतर्गत १४ उपकेंद्र हे स्काडा प्रणालीवर असून त्यापैकी ९ उपकेंद्र स्काडाव्दारे कार्यान्वित आहेत व उर्वरित ५ उपकेंद्रात देखभालीचे कंत्राट संपल्याकारणाने तांत्रिक अडचणीमुळे सदरचे उपकेंद्र स्काडाव्दारे कार्यान्वित नाहीत.

(३) हे खरे नाही.

देखभाल-दुरुस्तीचे कंत्राट जुलै २०२१ पासून संपले असून, सदर कामाच्या कंत्राटाचे नुतनीकरण करण्याबाबत महावितरण कंपनीच्या मुख्यालय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळमसरा (ता. पाचोरा, जि.जळगांव ) येथील अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार झाल्याबाबत

**(२२) * ५१३०० श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमसरा (ता. पाचोरा, जि.जळगांव ) येथील १३ वर्षीय अल्पवयीन दलित चर्मकार समाजातील मुलीला उचलून नेऊन तिच्यावर ७/८ नराधम मुलांनी सामूहिक अत्याचार केल्याच्या घटने प्रकरणी संबधित आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी राष्ट्रीय चर्मकार महासंघ, देऊळगाव राजा, बुलढाणा यांच्या तर्फे लेखी निवेदनाद्वारे तहसिलदार मार्फत जिल्हाधिकारी व तत्कालिन मुख्यमंत्री यांना माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान दिले होते हे खरे आहे काय,

(२)असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी पिंपळगाव हरे पोलीस स्टेशन, जि. जळगांव येथे गुरनं. ११७/२०२२ भा.द वि. कलम ३७६DA, ३७६(२)(J)(N), ३५४A(१)(एक), ३५४D, ३२३,५०४,५०६, बालकांचे लैंगिक गुन्ह्यापासून संरक्षण अधिनियम सन २०१२ चे कलम ४, ६ ,८,१२ सह अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(१) (R) (s) (w)(i) (ii) ३(२)(५) अन्वये दि. १४.०५.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच गुन्ह्यातील ८ आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दि. १५.०६.२०२२ नुसार दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कारंजा बहिरम (ता.परतवाडा जि.अमरावती ) येथील पंचशील आदिवासी आश्रमशाळेतील मुलींना झालेली विषबाधा

**(२३) * ५१५६९ श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा बहिरम (ता.परतवाडा, जि.अमरावती) येथील पंचशील आदिवासी आश्रमशाळेतील ३४ मुलींना विषबाधा झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :**(१) व (२) अपर आयुक्त कार्यालय अमरावती अधिनस्त, प्रकल्प अधिकारी, धारणी यांच्या अंतर्गत येत असलेल्या पंचशील आदिवासी आश्रमशाळा, बहिरम कारंजा येथे माहे सप्टेंबर महिन्यात ३४ मुलींना उलट्या पोटदुखीचा त्रास होत असल्याने त्यांना उपजिल्हा रुग्णालय, अचलपुर येथे भरती करण्यात आले होते.
पोलीस प्रशासनामार्फत संबंधित घटनेच्या अनुषंगाने अन्न व पाण्याचे नमुने तपासणी करीता प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. तपासणी अहवालानुसार अन्नातुन विषबाधा झाली नसल्याचे निष्पन्न झाले. मात्र शाळेच्या पाण्यामध्ये E.Coli चे प्रमाण निदर्शनास आले आहे.
दरम्यान सदर घटने प्रकरणी प्रकल्प अधिकारी, धारणी कार्यालयाने चौकशी समिती गठीत केली होती. सदर चौकशी समितीने दि. १७.०९.२०२२ रोजी प्राथमिक चौकशी केली आहे. सदर चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार संबंधितांवर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली असून प्राप्त खुलाशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आंबडवे (ता. मंडणगड जि. रत्नागिरी ) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळ गावी न्यायालय स्थापन करण्याबाबत**

**(२४) * ५०३०४ श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतीय घटनेचे शिल्पकार व देशाचे पहिले कायदा मंत्री भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंबडवे (मंडणगड) या मूळगावी न्यायालय स्थापन करावे असे मा.उच्च न्यायालयाने राज्य शासनास दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्र पाठविले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासंदर्भात न्यायालय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष आणि कोर्ट मॅनेजर यांनी उदयोग मंत्री व जिल्हापालक मंत्री, रत्नागिरी जिल्हा यांची निधी उपलब्ध करुन देण्याबाबत भेट घेतल्यावर निधी मंजुरीकरीता जिल्हा नियोजन समितीसमोर मान्यतेसाठी प्रस्ताव ठेवण्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना आदेशित केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, न्यायालयासाठी मान्यता, निधी व पदे भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, मा.उच्च न्यायालयाकडुन मंडणगड तालुक्यात दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग हे न्यायालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव दि.२२/९/२०२२ च्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे.
(२) होय, उपरोक्त न्यायालय स्थापन करण्यासंदर्भात न्यायालय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष आणि कोर्ट मॅनेजर यांनी मा.उद्योग मंत्री व मा.जिल्हापालक मंत्री, रत्नागिरी जिल्हा यांची भेट घेतली होती.
प्रस्तावित मंडणगड येथे न्यायालयाची स्थापना करण्याच्या अनुषंगाने तात्पुरत्या स्वरुपात भाड्याने घेतलेल्या इमारतीमध्ये न्यायालय कक्ष व न्यायाधीशांचे चेंबर, इमारतीमध्ये आवश्यक त्या ठिकाणी पार्टीशन तयार करणे, विद्युतीकरण इत्यादी सोईसुविधा करण्याकरीता होणाऱ्या खर्चासाठी न्यायालय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष आणि कोर्ट मॅनेजर यांनी जिल्हानियोजन समिती, रत्नागिरी यांच्याकडे निधीची मागणी केली आहे. त्याअनुषंगाने जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांनी दि.२४/११/२०२२ च्या आदेशान्वये दिवाणी व फौजदारी न्यायालय, मंडणगड करीता जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्या अखत्यारितील मौजे भिंगळोली, ता.मंडणगड येथील बहुउद्देशीय हॉल (Activity

Center) च्या दुमजली इमारतीमध्ये अंतर्गत बदल करण्याबाबतच्या प्राप्त रु.२८.१० लाख इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी दिली असून त्यापैकी रु.१४.०० लाख रकमेचे वितरण करण्यात आले आहे.
(३) मंडणगड तालुक्यात दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग हे न्यायालय स्थापनेबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## मालाड (मुंबई) येथील मेसर्स जेव्हीपीडी प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने ग्राहकांची केलेली आर्थिक फसवणूक

**(२५) * ५३४७१ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मालाड (पश्चिम) येथील सन २०१२ मध्ये सुरू केलेल्या भगतनी रियो या प्रकल्पाअंतर्गत मेसर्स जेव्हीपीडी प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने ग्राहकांची सुमारे रु. ३०० कोटी रूपयांची फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कंपनीचे दोन संचालक फरार असून एका संचालकाला सन २०१८ मध्ये जामिन मिळाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पामध्ये गुंतवणूक केलेल्या ग्राहकांना त्यांची संपूर्ण रक्कम परत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच गैरव्यवहार केलेल्या संचालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस : (**१) व्हीलेज काशी, मिरा भाईंदर रोड येथील भगतानी रिओ या प्रकल्पाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन सांताक्रूझ पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. २०७/२०१७ दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हाचा पुढील तपास आ.गु.वि. क्रमांक ४५/२०१७, भा.दं.वि. कलम ४०९, ४२०, १२० (ब) सह कलम ३, ४, ५, ६, १३ मोफा कायदा अन्वये आर्थिक गुन्हे शाखा यांच्याकडून करण्यात येत आहे.

सदर गुन्हयामध्ये सद्यस्थितीत तपासाअंती एकूण ११६२ सदनिका खरेदीदार असुन, त्यांची एकूण रक्कम रुपये ११६,३९,२९,२८८/- ची फसवणूक झाली आहे.
(२) आरोपी जे.व्ही.पी.डी. प्रॉपर्टीज प्रा.लि.चे एका संचालकास दिनांक ११/०१/२०१८ रोजी अटक करण्यात आली होती. उपरोक्त गुन्हयाचा तपास करुन आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले असून मा. न्यायालयाने आरोपीस जामिनावर मुक्त केले आहे.

सदर गुन्ह्यात पाहिजे आरोपी अन्य दोन संचालक परदेशात पळून गेले असून त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले आहेत. त्यांना परदेशातून परत आणण्याकरीता प्रत्यार्पण प्रस्ताव केंद्र शासनामार्फत दुबई येथे पाठविण्यात आला आहे.
(३) वर नमूद गुन्ह्याव्यतिरिक्त आरोपींविरुद्ध दाखल असलेल्या अन्य गुन्ह्यांच्याबाबतीत आरोपींच्या १० मालमत्ता संरक्षित करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कुर्ला महानंदानगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात झालेला गैरव्यवहार

**(२६) * ४९५९३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर जिल्ह्यातील कुर्ला महानंदानगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात झालेल्या गैरव्यवहाराबाबत तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांनी चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करुन चौकशीचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदर समितीमार्फत प्रकल्पाच्या परिशिष्ट-२ च्या सर्वेक्षणाच्या संदर्भांत जो गैरप्रकार झाला आहे त्याची चौकशी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, सदर गृहनिर्माण प्रकल्पातील सभासदांच्या तक्रारीनुसार slum Act १९७१ च्या Section २ (E) नुसार प्रत्येक झोपडीच्या ताबेधारकांची पात्रता निश्चित करण्यासाठी तरतूद असताना तसेच सभासद शासन निर्णय दि. १६.५.२०१५ व शासन निर्णय दि. १८.५.२०१८ या नुसार पात्र होत असतानाही विकासकाच्या संगनमताने म्हाडाचे संबंधित अधिकारी पात्रतेच्या संदर्भांत सभासदांना नाहक त्रास देत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय ,

(४)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही,

सदर समितीची कार्यकक्षा केवळ इमारतीच्या बांधकामात झालेल्या अनियमिततेची चौकशी करणे अशी होती. परिशिष्ट-२ च्या सर्वेक्षणाच्या संदर्भात झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करणे समितीच्या कार्यकक्षेत येत नव्हते.

(३) कुर्ला महानंदा सह.गृह.संस्थेमधील झोपडीधारकांची पात्रता सन १९९५ च्या मतदार यादीनुसार व पी.एम.जी.पी. प्रकल्पाच्या श्रेणीवाढ योजनेंतर्गत सदर संस्थेसोबत केलेल्या भाडेपट्टा करारनाम्यानुसार निश्चित करण्यात आलेली आहे. म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून पाठविण्यात आलेल्या परिशिष्ट-२ मध्ये एकूण ११५ झोपडीधारक असून म्हाडाच्या जमिनीवर १०९ झोपडीधारक पात्र असल्याचे दिसून येते. सदर परिशिष्ट-२ मध्ये म्हाडाच्या जमिनीवरील सर्व १०९ झोपडीधारक पात्र असल्यामुळे संस्थेतील झोपडीधारक पात्र होत असतानाही विकासकाच्या संगनमताने म्हाडाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून पात्रतेच्या संदर्भात सभासदांना नाहक त्रास देण्याची बाब वस्तुस्थितीला धरुन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खडकवासला पाटबंधारे विभागांतर्गत धरण साखळीतील कालवे, पोटचाऱ्या व को. प. बंधाऱ्यांची दुरवस्था झाल्याबाबत.

**(२७) * ५४३३० ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील खडकवासला पाटबंधारे विभाग अंतर्गत धरण साखळीतील कालवे, पोटचाऱ्या व को.प. बंधाऱ्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असल्याने पाण्याची मोठ्या प्रमाणावर नासाडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुरवस्था झालेल्या कालव्यांची कामे बिगरसिंचन, विशेष दुरुस्ती, विस्तार व सुधारणा या योजनांतर्गत करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दि. १७ जुलै २०२२ रोजी वा त्या सुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

कालव्याची दुरावस्था झालेली नाही. या कालव्यांचे नियमित परिरक्षण व दुरूस्ती करण्यात येते आणि त्या आधारे दोन्ही कालव्यातून सिंचनासाठी पाणी देण्यात येते.

तथापि, जुना मुठा उजवा कालवा हा १६० वर्ष जुना आहे व नवीन मुठा उजवा कालवा हा ६० वर्ष जुना आहे.

(२) हे खरे आहे.

कालव्याची दुरावस्था झालेली नाही. या कालव्यांचे नियमित परिरक्षण व दुरूस्ती करण्यात येते आणि त्या आधारे दोन्ही कालव्यातून सिंचनासाठी पाणी देण्यात येते.

तथापि जुना मुठा उजवा कालवा हा १६० वर्ष जुना आहे व नवीन मुठा उजवा कालवा हा ६० वर्ष जुना आहे. सदर कालव्यांचे नुतनीकरण व अस्तरीकरण करणे गरजेचे आहे व त्या कामांची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे.

(३) मा.लोकप्रतिनिधी यांचे दि.१७/०७/२०२२ रोजीच्या मागणीच्या अनुषंगाने, जुना मुठा उजवा कालवा व नवीन मुठा उजवा कालवा तसेच त्यावरील वितरण प्रणाली व को.प.बंधाऱ्यांची दुरूस्ती कामांपैकी एका कामाचे अंदाजपत्रक प्रदेश कार्यालयास सादर करण्यात आले आहे. उर्वरित कामाची अंदाजपत्रके तयार करण्याचे कात क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे. सक्षम स्तरावर सदर कामांना मान्यता घेऊन निधी उपलब्धतेनुसार कामे करणे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## सेलू (जि.परभणी ) येथील अल्पवयीन मुलीवर झालेला अत्याचार

**(२८) * ५१३५२ श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.परभणी) येथील ११ वर्षीय अल्पवयीन मुलीचे व तिच्या मावस भावाचे अपहरण करुन दोन नराधमांनी बोरी, (ता.जिंजूर, जि.परभणी) येथील कौसडी फाटा बोरी येथे मुलाला सोडून देऊन मुलीला कोक शिवारात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना माहे जानेवारी,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, महाराष्ट्र नाभिक महामंडळ, जिल्हा शाखा परभणी येथील जिल्हाध्यक्षांनी व इतर पदाधिकाऱ्यांनी दिनांक ८ सप्टेंबर २०२२ रोजी मा. मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याबाबत तसेच पिडीत मुलीच्या कुटूंबाला आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर घटना माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये घडलेली आहे.

(२) होय.

(३) प्रस्तुत प्रकरणी पोलिस स्टेशन सेलु येथे गु.र.नं. ३७१/२०२२ कलम ३६३, ३६६अ, ३७६(२)(१) , ३७६ड, ५०६, ३४ भादंवि सह कलम ४, ८, १२ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ अन्वये दि. ०६.०९.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी गुन्ह्यातील एकूण ०३ आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दि. ०७.१०.२०२२ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. मनोधैर्य योजनेअंतर्गत पिडीत मुलीच्या कुटुंबाला आर्थिक मदतीचा पहिला हप्ता देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी वीज जोडणी देण्याबाबत**

**(२९) * ५०१२४ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १ लाख ६९ हजार शेतकऱ्यांनी शेतीपंपासाठी विजजोडणी मिळण्याबाबत महावितरणकडे अनामत रक्कम भरुनही अद्यापही शेतकऱ्यांना वीज जोडणी करुन देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विज जोडणीकरीता महावितरण कंपनीकडे पुरेसा निधी नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सोलर पंपासाठी देखील प्रलंबित मागणी अर्जांना अद्यापही जोडण्या देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांना वीजजोडण्या तसेच सोलर पंप जोडणी तातडीने मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**(१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात सन २०२१-२०२२ मध्ये कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०, मुख्यमंत्री सौर कृषी योजना, जिल्हा वार्षिक योजना इत्यादी योजना अंतर्गत १,४५,८६७ कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्यात आले असून मार्च २०२२ अखेर १,८०,१०६ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत. सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबर २०२२ पर्यंत ७५,००२ कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

उच्चदाब वितरण प्रणाली योजनेच्या सुधारीत खर्चास (रु. ४७३४.६१ कोटी) दि. १५.०९.२०२१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली असून त्यापैकी विदर्भ व मराठवाडयाकरीता रु. २२३४ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच उर्वरित महाराष्ट्राकरीता रु. १२५९ कोटी इतका निधी महावितरण कंपनीने कर्ज स्वरुपात उपलब्ध करुन घेतला आहे.

तसेच कृषीपंप वीज जोडणी धोरण- २०२० अंतर्गत दि.३०.११.२०२२ रोजी ग्रामपंचायत स्तरावर रु. १२०९.५९ कोटी व जिल्हा स्तरावर रु. १२०९.५९ कोटी इतका आकस्मिकता निधी उपलब्ध आहे. तसेच, कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत २०१ ते ६०० मीटर पर्यंत अंतर असलेल्या कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्याकरीता शासनाने रु. ५०० कोटी इतका निधी महावितरणला वितरीत केलेला आहे.

(३) हे खरे नाही.

राज्यात सौर कृषी पंप आस्थापित करण्याकरीता मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना राबविण्यात आली. मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना टप्पा १, २, व ३ अंतर्गत १ लाख सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले असून योजनेचे उद्दिष्ट साध्य झाले आहे.

(४) राज्यात मार्च २०२२ अखेर १,८०,१०६ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत. सदर कृषीपंपाचे सन २०२२-२३ मध्ये मार्च २०२३ पर्यंत ऊर्जीकरण करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यानुषंगाने, सदर कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयांना निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार, सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबर २०२२ पर्यंत ७५,००२ कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्यात आले असून उर्वरित कृषीपंपांचे कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०, जिल्हा वार्षिक योजना इत्यादी योजनेअंतर्गत मार्च २०२३ पर्यंत ऊर्जीकरण पूर्ण करण्यात येणार आहे.

तसेच, केंद्र शासन व राज्य शासन मार्फत १ लक्ष पारेषण विरहित सौर कृषी पंप आस्थापित करण्याकरिता कुसुम घटक-ब योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेची अंमलबजावणी हे महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) करीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयातील नांदूर मध्यमेश्वर धरणाच्या उजवा तट व कडवा कालव्याच्या दुरूस्तीची काम न करता रुपयांची देयके मंजूर केल्याबाबत

**(३०) * ५३३८१ ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नांदूर मध्यमेश्वर धरणाच्या उजवा तट व कडवा कालव्याच्या दुरुस्तीसाठी नाबार्डने ७० कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालव्याच्या दुरुस्तीची कोणती कामे न करता कोटयवधी रुपयांची देयके मंजूर करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापही गोदावरी उजवा तट कालवा व डावा तट कालवा तसेच कडवा कॅनॉलची गळती थांबलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कालव्याची दुरुस्ती करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**(१) होय.

नाबार्ड अंतर्गतच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी-२० या मालिकेअंतर्गत सन २०१५-१६ ते सन २०१७-१८ या कालावधीसाठी गोदावरी कालवे नुतनीकरणाकरीता रु.६०.८८ कोटी तसेच कडवा कालवा दुरुस्तीसाठी रु.५१.६८ कोटी एवढे अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

नाबार्ड योजने अंतर्गत गोदावरी कालव्यांवरील जी बांधकामे केव्हाही कोसळून कालव्यावरील सिंचन, बिगरसिंचन आवर्तनात खंड पडू शकतो, अशा ब्रिटीशकालीन ४७ बांधकामांचे नुतणीकरण करण्यात आलेले असून त्यावर एकुण रु. ६०.८८ कोटी खर्च झाला आहे.

तसेच कडवा कालव्याची दुरुस्तीची कामे जुलै, २०२१ अखेर पुर्ण करण्यात आलेली असून त्यावर एकुण रु. ४५.०६ कोटी खर्च झाला आहे. तदनंतर सन २०२२ मध्ये दुरुस्तीची कोणतीही कामे करण्यात आलेली नाहीत, तसेच देयके अदा करण्यात आलेली नाहीत.

(३) अंशत खरे आहे.

गोदावरी उजवा व डाव्या कालव्यावरील ४७ बांधकामांतून गळती आढळून आलेली नाही.

कडवा कालवा दुरुस्तीची कामे प्रकल्प अहवाल बनविताना निदर्शनास आलेल्या त्रुटींप्रमाणे करण्यात आलेली आहेत. कडवा कालवा कि.मी. ० ते ४५ हा डोंगराळ भागातुन जात असून सदर भागामध्ये मुरुमाड भुस्तर आहे. अस्तरीकरणाची कामे कालव्याच्या पुर्ण लांबीत प्रस्तावित नसल्यामुळे काही लांबीत पाणी झिरपत असुन गळती दिसुन येत आहे.

(४) तरतुदी प्रमाणे सदर कामे झालेली असल्याने प्रश्न उदभवत नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राजापूर शहरातील (जि.रत्नागिरी )जलसंपदा विभागाकडून पुनर्निरीक्षित करण्यात आलेली पूररेषा रद्द करण्याबाबत

**(३१) * ५०५७८ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अर्जुना आणि कोदवली नदीपात्रात मोठया प्रमाणात गाळ साचला असतानाही विभागाकडून प्रत्यक्षात पाहणी व माहिती न घेता पूररेषा निश्चित करण्यात आली असून सदर पूररेषा ही चुकीची आणि जाचक असल्याचे माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त पूररेषा आणि सन २००८ मध्ये आखण्यात आलेली पूररेषा यामध्ये मोठ्या प्रमाणात फरक असून सदरहू पुररेषेनुसार निळी आणि लाल रेषा असलेल्या ज्या भागात कधीही पूर आलेला नाही अशा शहरात समाविष्ट केल्याने निम्म्या शहरवासीयांना स्थलांतरित करावे लागणार असून भविष्यात कोणतेही बांधकाम करता येणार नसल्याने नगरपरिषदेच्या उत्पन्नातही भर पडणार नसल्याने तेथील पुनर्निरिक्षीत केलेली पूररेषा रद्द करण्याबाबत मुख्याधिकारी यांच्या निदर्शनास आणून फेरसर्वेक्षण करण्याबाबत स्थानिकांच्यावतीने लेखी निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त पूररेषेचे फेरसर्वेक्षण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**(१) नाही.

जलसंपदा विभागामार्फत आखण्यात येणारी नदीची पूररेषा ही तांत्रिक अभ्यासावर आधारित असून सदर पूररेषा निश्चिती शासनाचे प्रचलित नियम व तांत्रिक कार्यपध्दतीनुसार करण्यात येते. त्यानुसार सदर नदीचे सर्वेक्षण (नदीचे काटछेद व तलांक इ.) व मागील ३० वर्षाच्या पर्जन्यमानानुसार जलशास्त्रीय अभ्यास करून पूर विसर्ग व पुररेषा निश्चित करण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सन २००८ मध्ये कोणतीही निळी व लाल पूररेषा आखणेत आलेली नाही.

मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कायाद्यांतर्गत निर्देश दिल्यानुसार सन २००५ ते २००७ मध्ये आलेल्या पूराच्या पातळीस अनुसरुन सदरची महत्तम पूर पातळी आखण्यात आलेली होती.

नगर परीषद हद्दीतील फेरसर्वेक्षण करणेत यावे अशी मागणी राजापूर नगर परिषदेमार्फत दिनांक १४.०७.२०२१ रोजीच्या पत्रानुसार क्षेत्रीय कार्यालयांकडे करणेत आलेली आहे.

(३) सन २०२० मध्ये केवळ अर्जुना नदीचे निळी व लाल पूररेषेचे सर्वेक्षण करणेत आलेले आहे. कोदवली नदीचे सर्वेक्षण त्यात अंतर्भूत नसल्याने राजापूर नगर परिषदेच्या फेरमागणी नुसार कोदवली नदीचे सर्वेक्षण अंतर्भूत करुन निळी व लाल पूररेषेचे फेरसर्वेक्षण एप्रिल २०२२ मध्ये करण्यात आलेले आहे.

त्यानुसार निळी व लाल पूररेषा निश्चिती व आखणीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उदद्भवत नाही.

-----------------

## खडकवासला प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामधील निवासी करण्यात आलेले पाणी पुणे महानगरपालिकेला देण्याबाबत

**(३२) * ५१७३८ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेत २०.३४ टीएमसी पाणी आवश्यक असून शहर व नव्याने समाविष्ट ३४ गावांमधील लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात पाण्याची मागणी वाढणार असल्याने पाटबंधारे महामंडळाच्या अखत्यारीतील खडकवासला प्रकल्पाचे लाभक्षेत्रामधील निवासी करण्यात आलेल्या सिंचन क्षेत्राचे पाणी पालिकेला उपलब्ध करून देण्याची मागणी महापालिकेतर्फे जलसंपदा विभागाला करण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर २०२२ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या मागणीनुसार खडकवासला प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामधील निवासी करण्यात आलेले पाणी महानगरपालिकेला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) असल्यास, पुणे शहराची वाढती लोकसंख्या, नव्याने समाविष्ट ३४ गावांची लोकसंख्या विचारात घेता पुणे शहराला वाढीव पाणी पुरवठा न केल्यामुळे धरणातून करारापेक्षा जास्त उचललेल्या पाण्यावर कोट्यावधी रूपयांचा दंड आकारण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**(१) होय.

पुणे महानगरपालिकेकडुन दि.१०.१२.२०२१ चे पत्रान्वये महानगर पालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या ११ गावे व नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांसाठी वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने घरगुती व औद्योगिक वापरासाठी मुळशी धरणातून ५ TMC वाढीव पाणी मागणी केलेली आहे.
(२) पुणे महानगरपालिकेस मंजूर असलेल्या १४.६१ TMC पाणी हे पुणे शहराच्या सन २०३१ च्या ७६.१६ लक्ष इतक्या लोकसंख्येसाठी शासनाने यापुर्वीच मंजुरी दिलेली आहे.
(३) व (४) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण आणि सेंट्रल पब्लिक हेल्थ बोर्ड यांनी दिलेल्या मापदंडापेक्षा पुणे महानगरपालिका जास्तीचे पाणी वापर करीत आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे ठोक जलदराप्रमाणे पुणे महानगरपालिकेस दंडनीय आकारणी करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगांव, मुंबई येथील आरे वन विभागाच्या परिसरात झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबवून वन विभागाच्या जागेतील पात्र झोपडीधारक कुटुंबाचे पुनर्वसन करणेबाबत

**(३३)** * **४९४७६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरीवली पूर्व, जिल्हा मुंबई उपनगर येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान मधील वन विभागाच्या जागेवर अतिक्रमण केलेल्या १३ हजार ७८६ पात्र कुटुंबाचे पुनर्वसन आरे दुग्ध वसाहत येथील जागेवर करण्यासाठी वन विभागाची ९० एकर जागा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला सन २०१८ मध्ये हस्तांतरीत करुनही अद्याप सदरहू जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे पुनर्विकास प्रकल्प राबविण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिंडोशी विधानसभा मतदारसंघातील सी.एस.क्र.५३९/१ वर अतिक्रमण केलेल्या ४ हजार ३५९ पात्र कुटुंबांनी वन विभागास प्रति झोपडे ७ हजार रुपये देयकार रक्कम सन २००८ साली भरूनही शासनाने अद्याप सदरहू झोपडीधारकांचा झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत समावेश केला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरे दुग्ध वसाहत येथील वन विभागाच्या जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे पुनर्विकास प्रकल्प राबविण्यास, दिंडोशी विधानसभा मतदारसंघातील सी.एस.क्र.५३९/१ वरील पात्र झोपडीधारकांचा एसआरए योजनेत समावेश करुन सदर पुनर्विकास योजनेचे काम त्वरीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**(१) वन विभागाची ९० एकर जागा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला हस्तांतरीत करण्यात आलेली नाही. तथापि, शासन निर्णय दि.२०.०२.२०१८ अन्वये गठीत करण्यात आलेल्या उच्चस्तरीय सशक्तता समितीच्या शिफारशींनुसार आरे वसाहत येथील वन विभागाच्या ताब्यातील ९० एकर क्षेत्र पुनर्वसन प्रकल्प राबविण्याकरीता म्हाडाकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे. मात्र, पुनर्वसनाकरीता TDR च्या मोबदल्यात इमारती बांधून देण्यासाठी म्हाडाने काढलेल्या निविदेस ७ वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही प्रतिसाद प्राप्त झाला नसल्याने, सदर निविदा दि.०३.०८.२०१९ रोजी रद्द करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) वर नमूद केल्याप्रमाणे पुनर्वसनाकरिता इमारती बांधण्यासाठी म्हाडाद्वारे काढण्यात आलेल्या निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने मौजे मालाड, सर्वे क्रमांक २३९/१ मधील पात्र अतिक्रमकांसह दुस-या टप्प्यात सन २००८ साली पुनर्वसनाकरिता रक्कम भरणा करणा-या इतर सर्व पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसनाची प्रक्रिया खोळंबली आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अतिक्रमकांचे पुनर्वसनासंबंधी तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दि.३०.०९.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील पात्र अतिक्रमक व आदिवासी पाड्यांचे पुनर्वसन करण्यासाठी आरे व्यतिरिक्त इतर जागा निश्चित करण्यासाठी तत्कालीन मा. मंत्री, पर्यटन, पर्यावरण व राजशिष्टाचार तथा पालकमंत्री, मुंबई उपनगर यांच्या अध्यक्षतेखाली महसूल व वन विभागाद्वारे समिति गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या दि.१३.०१.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत, आरे येथील जागेव्यतिरिक्त इतर संभाव्य जागांची निवड करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## कलकाम रिअल इन्फ्रा (इं.) लि. मुंबई, चंद्रपूर (शाखा) या कंपनीत गुंतवणूक केलेल्या रक्कमेची परतफेड करण्याबाबत

**(३४) * ४९५८५ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कलकाम रिअल इन्फ्रा (इं.) लि. मुंबई (चंद्रपूर शाखा) या कंपनीने चंद्रपूर जिल्हयातील नागरिकांना भरघोस व्याज, ठराविक वर्षांने दामदुप्पट पैसे मिळण्याचे आमिष दाखवून कलावती आणि तनिष्का या बनावट कंपन्या स्थापन करुन सुमारे ४० ते ५० कोटी रुपयांची गुंतवणूक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठेवींची मुदत संपल्यानंतर ग्राहकांनी त्यांच्या रक्कमेची मागणी केली असता कंपनीचे अध्यक्ष व अधिकाऱ्यांनी टाळाटाळ केली या संदर्भात ग्राहकांनी त्यांची फसवणूक केल्याबाबत व गुंतवलेले पैसे परत मिळण्याबाबत दि.१०/०५/२०२२ रोजी पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांचेकडे लेखी स्वरुपात तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यांत आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) कलकाम रिअल इन्फ्रा (इंडिया) लिमीटेड मुंबई (चंद्रपूर शाखा) या कंपनीमध्ये सन २०१४ ते २०१९ या कालावधीत फिर्यादी व इतर गुंतवणूकदारांनी गुंतवणूक केलेल्या एकूण रू.२,०४,१३,४३८/- इतक्या रकमेची योजनाचा परतफेडीचा कालावधी पूर्ण होऊनही परतफेडीची रक्कम गुंतवणूकदाराना अदा करण्यात आलेली नसल्याने आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरून दि.१७.०५.२०२२ रोजी पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र ४९८/२०२२, कलम ४२०,४०६,४०९,३४ भादंवि सह कलम ३,४ एमपीआयडी ॲक्ट १९९९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात एकूण ७ आरोपी निष्पन्न झाले असून गुन्हयाचा तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व शासकिय आश्रमशाळेमधील विदयार्थ्यांना सोईसुविधा पुरविण्याबाबत

**(३५) * ४९४४८ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर),**

**डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मजितपूर (ता.सडक अर्जुनी,जि.गोंदिया) येथील शासकिय माध्यामिक आश्रमशाळेतील १२० विदयार्थ्यांना क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी एकाच ट्रकमधून घेवून जात असताना काही विदयार्थ्यांना श्वास घेण्यास त्रास झाल्यामुळे १० विदयार्थी बेशुध्द पडल्याची घटना माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेशुध्द झालेल्या १० विदयार्थ्यांपैकी ७ विदयार्थ्यांना जवळच्या एकोडी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आले तर ३ विदयार्थीनीची प्रकृती नाजूक असल्याने त्यांना गोंदियाच्या शासकिय महाविदयालयात दाखल करण्यात आले, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर आश्रमशाळेचे मुख्याध्यापक व सहायक शिक्षक यांना अपर आदिवासी आयुक्त यांनी निलंबित केले आहे, हे, ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली, तसेच त्यानुषंगाने राज्यातील सर्व शासकिय आश्रमशाळेमधील विदयार्थ्यांना सोईसुविधा पुरविण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) होय

(२) होय

(३) होय,

चौकशीमध्ये दोषी आढळून आल्याने श्री. एस.के.थुलकर, माध्यमिक मुख्याध्यापक, शासकीय आश्रमशाळा, मजितपूर तसेच श्री. एन.टी.लिल्हारे, क्रीडा समन्वयक, शासकीय आश्रमशाळा, मजितपूर यांना अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांनी दिनांक २५.०९.२०२२ च्या आदेशान्वये निलंबित केलेले आहे.

(४) शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा, शासन मानकाप्रमाणे भोजन, नाश्ता, दूध, अंडी, केळी, शुध्द पिण्याचे पाणी, विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी, शैक्षणिक साहित्य खरेदीकरिता डी.बी.टी व इतर अनुषांगिक सर्व मुलभूत सोयीसुविधा वेळोवेळी पुरविण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**देगलूर (जि.नांदेड) तालुक्यातील मरखेल पोलिस ठाण्याच्या हद्दीत अनेक अवैध धंदे सुरु असल्याबाबत**

**(३६) * ५३०९१ श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (जि.नांदेड) तालुक्यातील मरखेल पोलिस ठाण्याच्या हद्दीत मोठया प्रमाणात मटका, जुगार अड्डे व अवैध वाहतूकीचे प्रकार होत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकरणी चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या भागातील सुरु असलेल्या अनेक अवैध धंदयांना आळा बसण्यासाठी व या प्रकरणाकडे दुर्लक्ष करणा-या संबंधीत अधिकारी व कर्मचा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३)

मरखेल पोलीस स्टेशनच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर मटका, जुगार व अवैध वाहतुक होत असल्याचे आढळून आलेले नाही. तथापि, माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये मटका, जुगार अड्डे असे अवैध धंदे चालविणाऱ्यां विरुध्द एकूण ४ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये ०७ आरोपींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यांत एकूण रुपये ३,६४०/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच सदर कालावधीमध्ये अवैध वाहतूक झाल्याचे आढळून आलेले नाही. अवैध धंद्यावर पोलीस घटकांकडून नियमितपणे कारवाई करण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## कनाशी (ता. कळवण, जि. नाशिक) येथे १३२/३३ के.व्ही. वीज उपकेंद्रास मंजुरीसह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३७) * ५१८०९ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण व सुरगाणा (जि. नाशिक) तालुक्यातील वीज पुरवठा सुरळीत होण्यासाठी कनाशी (ता.कळवण) येथे १३२/३३ के.व्ही.ए. उपकेंद्रास मंजुरी मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनीधींनी तत्कालिन मा.उप मुख्यमंत्री यांना दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजी तसेच तत्कालिन ऊर्जा मंत्री यांना दिनांक ७ फेब्रुवारी व दिनांक ५ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वीज उपकेंद्र मंजुर करणेबाबतचा प्रस्ताव देखील डीपीआरमध्ये समाविष्ट करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदरहू उपकेंद्रासाठी निधीसह मंजुरी मिळण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) १३२/३३ के.व्ही. नवीन अतिउच्चदाब कनाशी (ता.कळवण) उपकेंद्राचा तांत्रिक प्रस्ताव महावितरण कंपनीच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झाला असून सदर प्रस्तावाची तांत्रिक सुसाध्यता पडताळणी सांघिक कार्यालय स्तरावर प्रक्रियाधीन आहे. याची पडताळणी पुर्ण झाल्यावर आर्थिक व्यवहार्यता तपासून पुढील मंजुरीसाठी महापारेषण कंपनीस महावितरणकडून पाठविणेचे नियोजित आहे.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील महिलांची हिरकणी उद्योगाच्या संचालकांनी व पदाधिकाऱ्यांनी आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(३८) * ५०२७४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिलांना प्रशिक्षण व सामुग्री उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली हिरकणी उद्योगाच्या संचालकांनी व पदाधिकाऱ्यांनी भंडारा जिल्हयातील ५३०० महिलांची ३२ लाख ८६ हजार रुपयांची फसवणूक केली असल्याचे दिनांक २८ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर प्रकरणाची लेखी तक्रार पोलिस ठाणे,भंडारा येथे करण्यात येवून सुध्दा अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हिरकणी उद्योगाच्या संचालकांनी व पदाधिकाऱ्यांनी महिलांना प्रशिक्षण व सामुग्री उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी दि.२७.०९.२०२२ रोजी पोलीस ठाणे भंडारा येथे अप. क्र. ४४४/२०२२, कलम ४२०, ३४ भादंवी सह कलम ३, ४ एम.पी.आय.डी ॲक्ट १९९९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात असून पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील वांद्रे-वरळी सागरी सेतुवर झालेला अपघात**

**(३९) * ५०३९१ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे-वरळी सागरी सेतुवर माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये अपघात होऊन त्यात पाच जण ठार तर आठ जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर अपघाताची शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, अपघातातील मृत व जखमींच्या नातेवाईकांना कोणती आर्थिक मदत देण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) दि.५/१०/२०२२ रोजी पहाटे ०२.४० वाजता वांद्रे वरळी सी लिंकवर एका वाहनाचे टायर फूटल्याने ते वाहन लोखंडी रेलींगला धडकून थांबले. सदर वाहनातील प्रवाशांच्या मदतीकरीता इतर काही वाहने थांबली. त्यांतील प्रवाशांनी अपघाताची माहिती इतर वाहन चालकांना होण्याकरिता वाहनांच्या पाठीमागे रिफ्लेक्टर कोन ठेऊन लाल बॅटन दाखवून अपघाताचा इशारा केला.

पहाटे ०२.५३ च्या सुमारास ह्युंडाई क्रेटा वाहन चालकाने जाणिवपूर्वक रस्त्यावर भरधाव व बेदरकारपणे वाहन चालवून अपघात स्थळी धडक दिली त्यामुळे सदर अपघात स्थळावर मदत करणाऱ्या ५ व्यक्ती जागीच मृत पावले असून ८ व्यक्ती गंभीर जखमी झाले आहेत. वाहन चालकाविरुध्द वरळी पोलीस ठाणे गु.र.क्र. १११६/२०२२ भा.द.वि. कलम ३०४(२), ३०४, ३३७, ३३८ सह मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यास अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(३) अपघातातील मृत व जखमींच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाकडे कोणताही प्रस्ताव प्राप्त नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्हयातील कोलाड पाटबंधारे विभागाच्या आंबेवाडी किल्ला ते निवी या कालव्याला अनेक वर्षांपासून पाणी येत नसल्याबाबत**

**(४०) * ५०१०४ कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा तालुक्यातील (जि.रायगड)कोलाड पाटबंधारे विभागाच्या आंबेवाडी किल्ला ते निवी गावापर्यंत कालव्याला अनेक वर्षांपासून पाणी येत नसल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालवा दुरुस्तीची कामे पूर्ण होऊनही हक्काचे पाणी सोडले जात नसल्याने वाशी,लांडर,बोरघर,तळाघर व निवी या गावांना ऐन उन्हाळयात पाणीपुरवठा होत नसल्याने पाणी टंचाईस सामोरे जावे लागत असल्याने या गावांना पाणी न सोडल्यास ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गावांना सुरळीत पाणीपुरवठा होण्याच्यादृष्टिने कोणती उपाययोजना

केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) आंबेवाडी किल्ला ते निवी गावादरम्यान काळ सिंचन प्रकल्पाचा रोहा शाखा कालवा असून सदर कालवा ना-दुरुस्त आहे. त्यामुळे कालव्यास पाणी सोडण्यात आलेले नाही.
(२) होय, कालव्याची दुरुस्ती करुन पाणी सोडणेविषयी श्री.अमित घाग यांचे दि.२९/०९/२०२२, श्री. राजेंद्र जाधव यांचे दि.३०/०९/२०२२, ग्रुप ग्रामपचायत, वाशी-रोहा यांचे दि.२८/०९/२०२२, ग्रुप ग्रामपचायत, तळाघर-रोहा यांचे दि.१०/१०/२०२२ व बळीराजा शेतकरी सामाजिक संस्था, दुरटोली-रोहा यांचे दि. १४/१०/२०२२ रोजीचे निवेदन क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झाले आहे.
(३) पिण्याच्या पाण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत थेट कालवा उद्धव घेण्यात येत नाही. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्यासाठी मजिप्राच्या जल जिवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजना राबविण्यात येते.
परंतु कालवा दुरुस्ती कामांना सन २०२२-२३ च्या देखभाल दुरुस्ती अंतर्गत प्रापणसूचीमध्ये मंजूर करण्यात आले असून निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे. तसेच कालव्यातील गाळ काढण्याचे काम यांत्रिकी विभागाच्या मदतीने करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**सागाचीवाडी व वाघाचीवाडी (ता.पनवेल, जि.रायगड) या आदिवासी पाडयात एक महिन्यापासून वीज पुरवठा खंडीत असल्याबाबत**

**(४१) * ५२८१८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सागाचीवाडी व वाघाचीवाडी (ता.पनवेल, जि.रायगड) या आदिवासी पाडयात वीज पडून ट्रान्सफॉर्मरला आग लागल्यामुळे जवळपास ३५ दिवसांपासून वीज पुरवठा खंडीत असल्याने आदिवासी बांधवांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सागाचीवाडी व वाघाचीवाडी येथील वीज पुरवठा तातडीने सुरळीत करण्याबाबत तसेच सदर गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**(१) हे खरे आहे.
(२) दिनांक १२.१०.२०२२ रोजी सागाचीवाडी व वाघाचीवाडी येथील १०० के.व्ही. ए. क्षमतेचे रोहित्र वीज पडल्यामुळे नादुरुस्त झाले. सदरचे नादुरुस्त रोहित्र बदलुन त्याठिकाणी नवीन रोहित्र बसविण्याकरीता डोंगरमाथ्यावर जाण्याचा रस्ता सुस्थितीत नसल्याकारणाने पनवेल महानगरपालिकेने रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले. परंतु डोंगरमाथ्यावरुन येणाऱ्या पावसाच्या पाण्यामुळे रस्त्याची दुरुस्ती करता आली नाही. डोंगर माथ्यावरुन येणारे पावसाचे पाणी कमी झाल्यानंतर जेसीबीच्या साहाय्याने वाडीपर्यंत जाणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती स्थानिक प्रशासनामार्फत दिनांक २२.११.२०२२ अखेर पुर्ण झाल्यावर दिनांक २३.११.२०२२ रोजी नादुरुस्त रोहित्र बदलण्यात आले असून वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य शासनाने गिरणी कामगारांना बंद गिरण्यांच्या जमिनीवर घरे देण्याचा घेतलेला निर्णय**

**(४२) * ४९९४८ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने गिरणी कामगारांना बंद गिरण्यांच्या जमिनीवर घरे देण्याचा निर्णय घेऊनही सर्व गिरणी कामगारांचे मुंबईतच पुनर्वसन करण्यात अपयश येत असल्याप्रकरणी गिरणी कामगारांच्या सर्व श्रमिक संघटनेने माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मुंबईतील आझाद मैदानात मोर्चा काढून आंदोलन केलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरणी कामगारांसाठी कोन-पनवेल येथील २ हजार ४१८ घरांसाठी सन २०१६ मध्ये सोडत काढण्यात येऊनही घरांचा ताबा देण्यास अद्याप सुरुवात झाली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ८०० पेक्षा अधिक पात्र विजेत्यांकडून घराची रक्कम घेतली असून यातील अनेकांचा समान मासिक हप्ता सुरु झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरची घरे रहाण्यायोग्य नसल्याने त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(५)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर घरांची तत्काळ दुरुस्ती करुन यशस्वी विजेत्यांना सदर घरांचा ताबा देण्याबाबत व सर्व गिरणी कामगारांचे पुनर्वसन तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) अशंत: खरे आहे,सदरहू २,४१७ सदनिकांच्या सोडतीतील विजेत्यांपैकी ७०४ गिरणी कामगार/वारसांनी सदनिकेच्या विक्री किंमतीचा भरणा केला आहे. त्यापैकी ३०० गिरणी कामगारांनी/वारसदारांनी सदनिकेच्या पूर्ण रकमेचा व मुद्रांक शुल्काचा भरणा केलेला आहे, त्यांना म्हाडाच्या मुंबई मंडळामार्फत वितरणपत्र निर्गमित करण्यात आले आहेत.

(४), (५) व (६) मौजे कोन ता. पनवेल जि.रायगड येथील रेंटल हौसिंग योजनेअंतर्गत गिरणी कामगारांच्या घरासाठी उपलब्ध झालेल्या २,४७१ सदनिका कोविड-१९ रुग्णांच्या विलगीकरणासाठी देण्यात आल्या होत्या. सदर सदनिकांची दुरावस्था झाली असल्यामुळे उक्त सदनिकांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदनिकांचा ताबा गिरणी कामगारांना देण्यापूर्वी या सदनिकांची दुरुस्ती व इतर कामे करावयाची असल्याने त्याकरीता अंदाजे रु.५२.७१ कोटी खर्च अपेक्षित असून, तो खर्च म्हाडाकडून एम.एम.आर.डी.ए. ला प्राप्त होणाऱ्या सदनिकांच्या किंमतीतून वजा करुन, उर्वरित रक्कम म्हाडाने एम.एम.आर.डी.ए. ला प्रदान करण्याबाबत दिनांक ७/४/२०२२ रोजी तत्कालीन मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचेकडे पार पडलेल्या बैठकीत ठरले. त्यानुसार दुरुस्तीच्या कामाकरीता अपेक्षित असलेला खर्च एमएमआरडीएने करण्यासंदर्भात उचित आदेश देण्याची विनंती नगर विकास विभागास करण्यात आली आहे.

-----------------

**कल्याण (जि.ठाणे) येथे ग्रामीण भागात स्टरलाईट या वीज कंपनीची वीजवाहिनी शेतकऱ्यांना न विचारता टाकण्यात येत असल्याबाबत**

**(४३) * ५३८४९ अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथे ग्रामीण भागातून स्टरलाईट या वीज कंपनीची वीजवाहिनी टाकण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वीजवाहिनीसाठी उभारण्यात येणा-या टॉवरमुळे १५ गावांतील शेकडो हेक्टर जमीन संपादीत करण्यात येणार असून या जमिनीच्या मिळणाऱ्या अत्यल्प मोबदल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सरकारी काम आहे असे सांगत स्टरलाईट कंपनीच्या कर्मचा-यांनी शेतक-यांना न विचारताच त्यांच्या जमिनीतून टॉवरचे काम सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जमीन मोजणी व मिळणाऱ्या मोबदल्याबाबत स्पष्टता नसल्यामुळे या वीजवाहिनीला व टॉवरला स्थानिकांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू प्रकरणी तत्काळ कंपनीने या शेतक-यांच्या जमिनी मोजणी करून व योग्य तो मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सदर वीज वाहिनी स्टरलाईटच्या मुंबई ऊर्जा मार्ग प्रकल्पाच्या एक भाग आहे. सदर प्रकल्पास केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने दिनांक २३.०९.२०२१ च्या आदेशान्वये परवानगी दिली आहे.

(२) कल्याण तालुक्यातील ११ गावांमधील जमीनीमध्ये स्टरलाईट पॉवर कंपनीच्या मे. वापी II नॉर्थ लखीमपुर ट्रान्समिशन्स लि. (नवीन नाव- मुंबई ऊर्जा मार्ग लि.) या प्रकल्पासाठी वीजवाहिनी उभारणार आहे. सदर पारेषण वाहिनीच्या प्रकल्पात इतर विकास प्रकल्पाप्रमाणे भूसंपादन करण्यात येत नाही आणि जमिनीची मालकी मूळ जमिन मालकाकडेच रहाते. पारेषण वाहिनी उभारताना होणाऱ्या जमिनीच्या नुकसानीकरिता बाधित जमिन मालकांना नुकसान भरपाई देण्यात येते.

(३) केद्रीय विद्युत प्राधिकरण विद्युत मंत्रालय, भारत सरकारच्या दिनांक ०७ जानेवारी, २०१९ च्या पत्रान्वये पश्चिमी क्षेत्र बळकटीकरण योजना आणि उत्तर पूर्व क्षेत्र योजनेसाठी मे. वापी II नॉर्थ लखीमपुर ट्रान्समिशन्स लि. (नवीन नाव - मुंबई ऊर्जा मार्ग लि.) ला विद्युत अधिनियम कलम ६८ (१) च्या अंतर्गत पूर्व मंजूरी दिली आहे. तहसीलदार कल्याण यांनी उपविभागीय अधिकारी कल्याण यांना दिनांक १२.१२.२०२२ रोजी दिलेल्या अहवालात नडगाव, दानबाव, आडिवाली, बापसई, नवगाव, फळेगाव, चवरे, पोई, म्हस्कळ, वावेघर, वाळकस या गावात स्टरलाईट कंपनीने काम सुरु केले असल्याचे नमुद केले आहे.

(४) व (५) हे खरे आहे.

शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. धोरण-२०१६/ प्र.क्र.५२०/ऊर्जा-४, दिनांक ३१.०५.२०१७ नुसार मिळणारी नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या मागणीपेक्षा कमी असल्याने शेतकऱ्यांनी जमिनीच्या मोजणीस विरोध केला आहे. स्टरलाईट पॉवर कंपनीच्या मे. वापी II नॉर्थ लखीमपुर ट्रान्समिशन्स लि. (नवीन नाव- मुंबई ऊर्जा मार्ग लि.) यांनी मौजे पोई आणि मोजे चवरे या दोन गावांची मोजणी फी भरली असून पैकी पोई या गावाची मोजणी पूर्ण झाली आहे. उर्वरित ९ गावांची मोजणी फी अद्याप स्टरलाईट पॉवर कंपनीने भरलेली नाही. मोजणी प्रक्रिया उप अधिक्षक, भूमी अभिलेख यांचे स्तरावर सुरु आहे.

तसेच शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. धोरण-२०१६/ प्र.क्र.५२०/ऊर्जा-४, दि.३१.०५.२०१७ हा अधिक्रमित करुन महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडून नव्याने निर्गमित शासन निर्णय दिनांक ०२.११.२०२२ व दिनांक ०१.१२.२०२२ नुसार अतिउच्च दाब पारेषण

वाहिन्यांसाठी मनोरा व वीजवाहिनी खालील बाधित जमिनींची नुकसान भरपाई ठरविण्याची कार्यवाही नियोजित आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील निम्न दुधना प्रकल्पाची अनेक कामे प्रलंबित असल्याबाबत

**(४४) * ५३५०० श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील निम्न दुधना प्रकल्पाची अनेक कामे प्रलंबित असल्याने रब्बी सिंचनाची प्रतीक्षा शेतकऱ्यांना कायम असल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास दुधना प्रकल्प अंतर्गत ५३ हजार ३७९ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येत असून रब्बीसाठी पाटबंधारे विभागाकडून नियोजन केले जाते, मात्र मागील अनेक वर्षापासून रब्बी हंगामात सिंचनाचे पाणी मिळावे यासाठी उपाययोजना करणे आवश्यक असताना ही प्रशासनाकडून नियोजन करण्यात आले नाही तसेच वितरिकांची कामे अद्यापही पूर्ण झालेली नसून काही कामे निकृष्ट झाली असल्याने संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पाच्या सिंचनाचा लाभ जालना जिल्ह्यातील परतुर मंठा आणि परभणी जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील गावांना होत असतानाही वितरिका पूर्ण न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चालू हंगामात शेतकऱ्यांना रब्बी पिकासाठी मुबलक पाणी मिळण्याकरिता वितरिकांची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली व करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
निम्न दुधना प्रकल्पाच्या दोन्ही मुख्य कालव्याचे मातीकाम, बांधकामे व अस्तरीकरणाची कामे पूर्ण आहेत. तसेच दोन्ही कालव्यावरील वितरण व्यवस्थेची मातीकाम व बांधकाम पूर्ण झालेली आहेत. वितरण व्यवस्थेच्या अस्तरीकरणाचे काम सलगतेने प्रगतीपथावर असून, एकूण ४०३ कि.मी. लांबीपैकी ३२५ कि.मी. लांबीमधील कामे पूर्ण आहेत व उर्वरित कामे जून २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
निम्न दुधना प्रकल्पावर सन २०२१-२२ मध्ये प्रत्यक्ष मागणी नुसार ८६०० हे. सिंचन करण्यात आले आहे.
प्रकल्पातील प्रस्तावित प्राथमिक सिंचन कार्यक्रम (PIP) २०२२-२३ नुसार रब्बी हंगामात १०५०० हे. व उन्हाळी हंगामात ६००० हे. असे १६५०० हे. वर सिंचन कार्यक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले असून, माहे नोव्हेंबर -२०२२ दरम्यानच्या पहिल्या पाणीपाळीत रब्बी हंगामात सुमारे ५००० हे. क्षेत्रावर सिंचन झाले आहे.
वितरीकेच्या कामाची वेळोवेळी तपासणी, गुणनियंत्रण मंडळ या त्रयस्थ यंत्रणेमार्फत झालेली असुन, प्राप्त निष्कर्ष समाधानकारक आहेत.
(३) वितरिकेच्या एकुण ४०३ कि.मी लांबीपैकी ३२५ कि.मी लांबीतील अस्तरीकरणाची कामे पुर्ण असुन उर्वरीत ७८ कि.मी लांबीतील अस्तरीकरणाची कामे शिल्लक आहेत. अस्तरीकरणाशिवाय वितरिकेची इतर सर्व कामे पुर्ण आहेत.
या प्रकल्पावर भुसंपादनावर झालेल्या वाढीव खर्चामुळे वितरिकेच्या अस्तरीकरणाची कामे प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रकल्पास चतुर्थ सुप्रमा प्राप्त होताच वितरीकेची अस्तरीकरणाची कामे प्राधान्याने पुर्ण करण्यात येतील.
(५) वरील प्रमाणे.

-----------------

**राज्यातील अंमली पदार्थाच्या तस्करीला आळा घालण्यासाठी सक्षम यंत्रणा व उपाययोजना करण्याबाबत**

**(४५) * ४९४५९ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः मुंबई व परिसरातील भागात अंमली पदार्थाची तस्करी दिवसेंदिवस वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत तीन महिन्यात तब्बल ४ हजार कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या किती गुन्हेगारांवर आतापर्यंत कारवाई करण्यात आली आहे व अंमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती सक्षम यंत्रणा वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) मागील तीन महिन्यात महाराष्ट्र राज्यात अंमली पदार्थ कायद्यांतर्गत अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/ वाहतूक करणेसंदर्भात एकूण ३६२ गुन्हे दाखल झाले असून एकूण रू.५१६५.४४ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

(३) राज्यात सन २०२२ मध्ये (ऑक्टोबर २०२२ पर्यंत) अंमली पदार्थ कायद्यांतर्गत अंमली पदार्थांच्या सेवनाबाबत एकूण ९५३० गुन्हे दाखल करण्यात आले असून ९७०० आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतूक करण्याबाबत एकूण १५३० गुन्हे दाखल झाले असून २०१३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकांमध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेला आहे. अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची अंमली पदार्थांबाबतचे "समन्वय अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. राज्यामध्ये ॲन्टी नार्कोटीक्स टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे. तसेच केंद्र शासनाच्या दि. २५.०३.२०२२ च्या आदेशानुसार अंमली पदार्थांवर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोको ऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोको ऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थांवर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## वैनगंगा पैनगंगा प्रकल्प ( चिखली जि. बुलढाणा) कार्यान्वित करण्याबाबत

**(४६) * ५३३०४ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैनगंगा नदीच्या खोऱ्यातून नळगंगा नदीपर्यंत येणाऱ्या गावांना पाणी उपलब्ध होण्यासाठी वैनगंगा पैनगंगा प्रकल्प हाती घेवून सहा जिल्ह्यांत यासाठी ३१ नवीन धरणे बांधली जाणार आहेत, ८ प्रकल्पांची उंची वाढवली जाणार असून, ४ प्रकल्पांचे पुनर्भरण केले जाणार आहे तसेच ४२६ किलो मीटर लांबीच्या या प्रवासात सात बोगद्यातून नदीचे पाणी आणले जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाला बुलडाणा जिल्ह्यातील खामगांव येथून वाढवून घाटावरील भागातील पैनगंगा प्रकल्पात आणून वाशिम पुढे न्यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे केलेली असुन याबाबत अवर सचिव, जलसंपदा विभाग यांनी खामगाव ते पेनटाकळी या वाढी नोव्हेंबर, २०१९ व सर्वेक्षण व समन्वयासाठी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाला दिनांक १६ नोव्हेंबर, २०१९ व दिनांक २९ नोव्हेंबर, २०१९ रोजी लेखी स्वरुपात कळविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत शसनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**(१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

श्री. प्रतापराव जाधव, लोकसभा सदस्य यांचे दि. १७.९.२०१९ चे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे. उपरोक्त निवेदनाचे अनुषंगाने अभिप्राय / अहवाल सादर करणेस शासन पत्र दि. १६.११.२०१९ व दि. २९.११.२०१९ अन्वये महामंडळास निर्देशित केले होते. तसेच श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. यांचे दि. ११.७.२०२१ चे निवेदन शासनास प्राप्त झाले असून महामंडळाकडून प्राप्त अहवालानुसार तत्कालीन मा. जलसंपदा मंत्री यांनी त्यांचे दि. ९.११.२०२१ चे पत्रान्वये योजनेची सद्यस्थिती श्रीमती श्वेता महाले, वि. स. स. यांना अवगत केली आहे. तदनंतर, श्रीमती श्वेता महाले, विसस यांचेकडून दि. ११.७.२०२२ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) उपरोक्त निवेदनाचे अनुषंगाने महामंडळाकडून प्राप्त अहवालानुसार राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने सादर केलेल्या अभ्यासाप्रमाणे वैनगंगा योजनेची पाणी गरज १७७२ दलघमी व त्यात विविध लोकप्रतिनिधीनी केलेल्या मागण्यांचा समावेश करुन योजनेची व्याप्ती वाढविल्यास योजनेचा एकूण पाणीवापर २०८५ दलघमी (१७७२+२८३+३०) येऊन त्याची विश्वासार्हता जवळपास ५९% येते.

सद्यस्थितीत, महामंडळाचे अभ्यासानुसार गोसीखुर्द प्रकल्पस्थळी ७५% विश्वासार्हतेने ८९६.३७ दलघमी इतकेच पाणी शिल्लक आहे. सबब, वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पासाठी आवश्यक १७७२ दलघमी पाण्यासाठी ७५% विश्वासार्हतेने कमी पडणारे पाणी हे मध्यप्रदेश राज्याचे विनावापर वाहून जाणाऱ्या पाण्यातून संकल्पीत करणेत येत असून त्यानुसार १७७२ दलघमी पाणी वापरास मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक यांनी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्रदान केले आहे. प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्रशासकीय मान्यतेच्या कार्यवाहीसाठी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडे सादर झाला असुन तपासणी प्रगतीत आहे. सदर प्रकल्पास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांची मान्यता प्राप्त झालेनंतर प्रशासकीय मान्यता प्रदान करणे विषयी निर्णय घेणे शक्य होईल.

उपरोक्त निवेदनाव्दारे वाढीव मागणीच्या अनुषंगाने प्राथमिक अभ्यास क्षेत्रीय स्तरावर करण्यात आला असून अतिरिक्त पाणी उपलब्धता निश्चित झाल्यावर योजनेचे क्षेत्र निश्चित होऊन आवश्यकतेप्रमाणे सर्वेक्षण करणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महावितरण विद्युत सहायक भरतीमधील पात्र उमेदवांराना नियुक्ती देण्याबाबत

**(४७) * ४९५०९ श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीने उपकेंद्र सहायक पदाची भरती प्रक्रिया राबवली मात्र मागील दोन वर्षांपासून उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी न झाल्याने १ हजार २९ उमेदवार नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण विदयुत सहायक भरतीमधील पात्र उमेदवांराना त्वरित नियुक्ती द्यावी व अन्य मागण्यांकरिता माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान विदयुत सहायक उमेदवारांनी आझाद मैदानात बेमुदत उपोषणास बसले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विदयुत सहायक उमेदवारांच्या मागण्यांचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रतीक्षा यादीवरील उमदेवारांना नोकरीत सामावून घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

उपकेंद्र सहायक पदाच्या निवड यादीतील उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली असून प्रतिक्षा यादीतील १०१२ उमेदवारांना मा. उच्च न्यायालय, मुंबई, याचिका क्र. २६६३ व संलग्न न्यायालयीन प्रकरणामुळे महावितरण कंपनीमार्फ़त नियुक्ती देण्यात आलेल्या नव्हत्या.

(२) होय, हे खरे आहे.

(३) ई.डब्ल्यू.एस. प्रवर्गातील उमेदवारांना त्वरीत नियुक्ती देणे, एस.ई.बी. सी. प्रवर्गातुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देणे, समांतर आरक्षणाशिवाय प्रतिक्षा यादी कार्यान्वित करणेबाबत इत्यादी मागण्या विद्युत सहाय्यक पदाच्या उमेदवारांनी केल्या आहेत.

(४) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.२६६३/२०२१ मध्ये मा. न्यायालयाने दि.२९.०७.२०२२ रोजी दिलेल्या निर्णयानुसार "विद्युत सहाय्यक" पदाची सुधारीत निवड यादी तसेच समांतर आरक्षणासह सुधारीत प्रतिक्षा यादी दि. २७.१०.२०२२ रोजी प्रसारीत करण्यात येऊन, प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्तीसाठी वर्ग करण्यात आलेल्या परिमंडळामध्ये त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ दरम्यान करण्यात येऊन पात्र उमेदवारांच्या नियुक्तीबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे. सद्यस्थितीत, "विद्युत सहाय्यक" पदाकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने सुमारे २९७५ पात्र उमेदवारांना नियुक्तीबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे. "विद्युत सहाय्यक" पदाच्या भरती प्रक्रियेत निवड यादीमधून १८९७ व प्रतिक्षा यादीमधून १०७८ पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे.

"उपकेंद्र सहाय्यक" पदाचा निवड यादीतील प्रवर्गनिहाय रिक्त पदाचा विचार करून दि. २५.११.२०२२ रोजी प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आली. सदर उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ दरम्यान करण्यात आली असून २८७ उमेदवारांपैकी २०७ पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. "उपकेंद्र सहाय्यक" पदाच्या भरती प्रक्रियेत एकूण २०२५ पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली असून निवड यादीमधून १८१८ व प्रतिक्षा यादीमधून २०७ पात्र उमेदवारांना महावितरण कंपनीमार्फ़त नियुक्ती देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उध्द्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती योजनेबाबतची माहिती मिळण्याबाबत

**(४८) * ४९८३४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे या उद्देशाने आदिवासी विकास विभागाकडून परदेशी शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचा प्रचार व प्रसार न झाल्याने आणि योजनेतील जाचक अटींमुळे एकही आदिवासी विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शिष्यवृत्ती योजनेबाबतची माहिती विद्यार्थ्यांना मिळत नसल्याने आदिवासी विभागाकडून प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्याची मागणी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने या योजनेचा आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये प्रचार व प्रसार करण्यासह या योजनेतील जाचक अटी रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सन २००७-०८ ते सन २०२२-२३ या कालावधीत एकूण ४४ विद्यार्थ्यांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ मंजूर करण्यात आला आहे.

(३) अशाप्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) शासन निर्णय दिनांक १६.०३.२०१६ अन्वये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याच्या अनुषंगाने अर्ज सादर करण्यापासून ते लाभार्थ्यांची निवड करण्याबाबतचा कालबध्द कार्यक्रम नमूद केला आहे. त्या अनुषंगाने आयुक्त कार्यालयस्तरावरुन प्रतिवर्षी माहे मे मध्ये परदेशी शिष्यवृत्ती योजनेची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात येते.

तसेच शासन निर्णय दिनांक १६.०३.२०१६ अन्वये विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लक्ष इतकी करण्यात आली आहे. तसेच विद्यापीठांचे क्यू एस वर्ल्ड रॅकींग ३०० ठेवण्यात आले आहे. विविध संघटना यांच्या मागणीनुसार शासन निर्णय दिनांक १६.०३.२०१६ मध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालाड पूर्व, कुरार गांव, लक्ष्मण नगर येथील शिवरंजन सह. गृहनिर्माण संस्थेमधील बोगस झोपडीधारकांना निष्कासीत करुन मुळ झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(४९) * ४९४८२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पश्चिम उपनगर, मालाड (पूर्व), कुरार गांव, लक्ष्मण नगर, सर्व्हे क्र.५०९ मधील शिवरंजन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या एसआरए प्रकल्पात विकासकाने १ व २ अशा सात मजली २ इमारतींचे बांधकाम करुन यामध्ये सुमारे

७७ प्रकल्पाबाहेरील झोपडीधारक कुटुंबांना बेकायदेशीररित्या नवीन घरांचा ताबा दिल्याचे दिनांक २६ ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्पातील इमारत १ चे बांधकाम हेतूपूर्वक प्रलंबित ठेवून ३५ पात्र झोपडीधारकांना घरापासून वंचित ठेवले तसेच ३६ कुटुंबियांचे घरभाडे देखील थकविलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणातील ७७ बोगस सदनिकांची मान्यता रद्द करुन इमारत क्र.१ चे बांधकाम तातडीने पूर्ण करुन ३५ मुळ पात्र कुटुंबांना घराचा ताबा देऊन त्यांचे पूनर्वसन करणे व थकीत भाडे अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर प्रकरणातील घरांच्या वितरणाबाबत विकासाकडून झालेल्या गैरप्रकरणाची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

शिवरंजन सह.गृह.संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत दि.१२.०६.२००६ रोजी निर्गमित केलेल्या परिशिष्ट-II नुसार ९५ झोपडीधारक पात्र होते. दरम्यानच्या काळात तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी दिलेल्या फेरसर्व्हेक्षणाच्या आदेशानुसार करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणाअंती योजनेत एकूण ८५ पात्र व ११ अपात्र झोपडीधारक होते.

योजनेतील एकूण पात्र झोपडीधारकांपैकी ८५ निवासी तर २ अनिवासी झोपडीधारक आहेत. त्यापैकी ५० झोपडीधारकांना इमारत क्र.२ मधील तर ३५ झोपडीधारकांना इमारत क्र.१ मधील सदनिका वितरित करण्यात आलेल्या आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संस्थेच्या इमारतीमधील सदनिकांची तपासणी करण्यात आली असता १० सदनिकांमध्ये पात्र व्यक्तीं व्यतिरिक्त अन्य व्यक्ती राहात असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार अनधिकृतपणे राहणाऱ्या व्यक्तींवर कलम ३ ई नुसार निष्कासनाची कारवाई सक्षम प्राधिकारी-५ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्यामार्फत सुरु आहे.
(२) हे खरे नाही.

संस्थेच्या मंजूर परिशिष्ट-२ व पुरवणी परिशिष्ट-२ मधील सर्व पात्र झोपडीधारकांना सदनिकांचे वाटप करण्यांत आलेले आहे.

तसेच ३६ झोपडीधारकांचे घरभाडे थकविल्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे कोणतीही तक्रार प्राप्त नाही. तथापि, श्री.सुरेश फकीरा पाटील यांनी भाडे मिळण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे अर्ज केला होता. सदर अर्जास अनुसरुन सुनावणी आयोजित करुन विकासकास घरभाडे अदा करणेबाबत सूचना देण्यात आलेली होती. परंतु विकासकाने भाडे अदा न केल्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.२२.०८.२०१९ रोजीच्या पत्राने विकासकाचे विक्री घटकातील बांधकाम थांबविण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सहकार विभागाने अभियांत्रिकी विभागास कळविलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रकरणी महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम ३ ई नुसार सक्षम प्राधिकारी-५ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्यामार्फत कारवाई सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जव्हार, मोखाडा,वाडा (जि.पालघर) तालुक्यांत वन विभागातील अधिकाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार

**(५०) * ४९६३३ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार, वाडा व मोखाडा (जि.पालघर) सामाजिक वनीकरण विभागांतर्गत सन २०१५-१६ आणि २०१७-१८ करिता जलसंधारण विषयक कामांसाठी प्राप्त सुमारे ७८ कोटी रुपयांचा निधी कोणत्याही प्रकारे काम न करता परस्पर बळकविल्याचे केल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी सामाजिक वनीकरण विभागाने तत्कालीन मुख्य वनसंरक्षक व अन्य १० अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास विरुध्द जव्हार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने या सर्व गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सहायक वन संरक्षक, सामाजिक वनिकरण, ठाणे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सामाजिक वनीरण विभागातील तत्कालीन मुख्य वनसंरक्षक व अन्य १० अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द जव्हार पोलीस ठाणे, जिल्हा पालघर येथे गु.र.क्र. १९७/२०२२ भा.द.वि. सं. कलम १२० (ब), १९६, २१८, ४२०, ४६७, ४६८, ४७१, ४०६, ४०८, ४०९, ३४ प्रमाणे दि. १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ताडदेव (मुंबई)परिसरात पोलीसांसाठी राखीव असलेल्या भूखंडावर दोन अवैध इमारती बांधल्याबाबत**

**(५१) * ४९४६० श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील ताडदेव परिसरात पोलीसांसाठी राखीव असलेल्या भूखंडाच्या काही भागावर बनावट कागदपत्रांच्या आधारे दोन उंच इमारती बांधुन घरांची विक्री करत ३०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी ताडदेव पोलीस ठाण्यात तक्रारही नोंदवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार ताडदेव पो.ठाणे गु.र.क्र.६७९/२२, भा.दं.वि. कलम ४०९, ४२०, ४४७, ४६४, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) (एमईसीआर क्र.५/२२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे पुढील तपासासाठी वर्ग करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथील गु.र.क्र. १४६/२२ असा असून गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण (जि.ठाणे) ग्रामीण मधील २७ विकासकांविरोधात मानपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याबाबत**

**(५२) * ४९६४२ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बनावट कागदपत्रांच्या आधारे बांधकाम परवानगी मिळविल्यामुळे ठाणे जिल्हयातील कल्याण ग्रामीण मधील २७ विकासकांविरोधात मानपाडा पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला असून डोंबिवलीतील ३८ विकासकांविरोधात केडीएमसीच्या नगररचना विभागाच्या तक्रारीनंतर रामनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असल्याचे माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवलीतील ३८ विकासकांनी सन २०१९ पासून ते आतापर्यंत बांधकाम करण्यासाठी केडीएमसीचा

विकास अधिभार शुल्क न भरता बांधकाम परवानगीची बनावट कागदपत्रे तयार करुन ती खरी आहेत असे भासवून महानगरपालिकेला सादर करुन फसवणूक केली असून महारेरा प्राधिकरणाने इमारत बांधकाम प्रमाणपत्र मिळविलेल्या ५२ विकासकांचे नोंदणी प्रमाणपत्र रदद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने या सर्व विकासकांवर तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस : (**१) होय, हे खरे आहे.
कल्याण ग्रामीण परिसरातील २७ बांधकाम धारकांनी बनावट बांधकाम परवाने तयार करून विकसित केल्याबाबत दिनांक २७/०९/२०२२ रोजी मानपाडा पोलीस ठाणे गु.र.क्र.७५०/२०२२, भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४०९, ११४, १२०(ब), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या कार्यक्षेत्रातील इतर ३८ बांधकाम धारकांनी बनावट बांधकाम परवानगी कागदपत्रांच्या आधारे मिळकती विकसित करुन महानगरपालिकेची तसेच ग्राहकांची फसवणूक केल्याने दिनांक ०३/१०/२०२२ रोजी डोंबिवली पोलीस स्टेशन गु.र.क्र.३७० / २०२२ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ४०९, ११४, १२०(ब), ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी ६५ प्रकल्पामधील बांधकाम परवानगी बनावट असल्याने महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडून (महारेरा) सदर ६५ प्रकल्पांचे सुनावणी घेऊन नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहेत.
(३) प्रस्तुत प्रकरणी दोन्ही गुन्हयांचा तपास करण्यात येत असुन आता पर्यंत १० आरोपी यांना अटक करण्यात आली असून गुन्ह्यातील दोषी व त्यांना आर्थिक फायदा होण्याच्या हेतूने बनावट कागदपत्र तयार करणारे यांचा शोध घेवून, निष्पन्न करून त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.